आगाऊ रु० ९ डाक हांशील ०।२
,, ३ ,, ,, ०८
लेर ,, ७ ,, ,, १०८
अंकास........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Per annum in advance 0 Postage 18 as
Per annum in arrears 7 ,, 1 R 8as
Six monthly............ 3 ,, 8 as
single copy................................ 4 as

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY OCTOBER 5 1885 NO 39

पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख ५ माहे आक्टोबर सन १८८५ इ० अंक ३९

PHOTOGRAPHS! PHOTOGRAPHS!!

*IMPORTED direct from the Continent. Artistic Studies from Life, Classical and Mythological undraped Figures, Statuary, Sacred and Secular Photographs, Portraits of Celebrities, Pretty Women, English and French Actresses, Selections sent out on approval on receipt of deposit of 10 s. and upwards. Price Lists and complete Catalogues post free. Address, Continental Novelty Co., 106 ...nd, London, England. The Trade ...lied.*

## पक्षकार लोकांस फार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए एल. एल. बी. मुंबई हायकोर्टाचे वकील हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचें हापीस "वऱ्हाडसमाचार" छापखान्याशेजारीं काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८४ इ० } पत्रकर्ते.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मूर्तिजापूर ता. २८-९-८५

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस,

वि. वि. मी वारंवार आपल्या भेटीस येऊन ही आपण माझें योग्य आदरातिथ्य करितां, म्हणून पुनः पुनः येण्याची इच्छा होते. आपणांस कंटाळा येऊं लागला म्हणजे अगाऊ कळवावें.

आपल्या गेल्या अंकीं माझ्या पत्रापुढें येथलेंच दुसरें एक पत्र छापलें होतें. त्यांत आमच्या येथील आस्पिटल असिस्टंट विषयीं थोडासा चमत्कारिक मजकूर होता. त्यांत सरकारी दवाखान्यांत फुकट औषधें मिळत असून ती न घेतां लोक पदरमोड करून गांवठी वैद्याकडे जातात असा मजकूर होता. या पत्रांतील हा मजकूर अक्षरशः खरा आहे, परंतु यांत नवल तें कोणतें? उमरावतींत एक जंगी व एक छोटा असे सरकारी दोन दवाखाने आहेत; शिवाय डा. गोविंदराव यांचा एक खानगी दवाखाना आहे; गांवठी वैद्य तेथें किती असतील याचा नेम नाहीं. आतां सरकारी दवाखान्यांत फुकट औषधें मिळत असतां, डा. गोविंदरावांस ही दरमहा २००-३०० रुपये पडतात. गांवठी वैद्यांचा ही ... ...ळतो. हा सरकारी डा- ... नव्हे. हा उघड ... आणि मला तर यां-

त कांहींच वावगें दिसत नाहीं. नुकतेंच येथील एक पोलीस कान्स्टेबल डिस्पेन्सरींत बरेच दिवस औषधें घेत होता; एके दिवशीं त्यानें ते फुकट औषध बंद केलें आणि वे. शा. सं. सखाराम शास्त्री यांचें औषध घेतलें तों सुमारें १५ दिवसांत त्याला चांगला आराम झाला. त्याचा भोग सरण्याला आणि वैद्याची गोळी लागूं होण्यास एकच गांठ पडली, त्यास डाक्टरानें तरी काय करावें!! असो, अशा मजकुराबद्दल आमचे डाक्टर साहेब अगदींच पर्वा करणार नाहींत व आपल्या कर्तव्यास अंतरणार नाहींत अशी उमेद आहे.

योग्यस्मारक—आमचे लोकप्रिय तहसिलदार साहेबांनीं अलीकडे रस्याचा दुतर्फा, साहेब लोक तंबू देतात त्याजागीं, स्टेशनाजवळ आणि बाजारांत शेकडों झाडें लाविलीं ... ...यांत आंब्याचीं पुष्कळ आहेत. साहेबलोकांच्या उतरण्याच्या जागीं बऱ्याच भागावर आंब्याचीं झाडें लावून याला लांकडाचें अवाड केलें आहे. ७।८ वर्षांनीं हीं झाडें मोठीं झाल्यावर बाजार आणि स्टेशनावरून गांवांत जाण्याचा जो मोठा रस्ता आहे, त्याला आणि छावणीच्या ठिकाणीं इतकी कांहीं विलक्षण शोभा येईल कीं आमच्या तहसीलदार साहेबांचें तें एक उत्तम स्मारक होईल हें सांगणें नको.

स्टेशनचारस्ता— हा रस्ता तयार झाल्या पासून आज तागाईत त्याची मरामत कधींच झाली नव्हती. पावसाळ्यांत या रस्त्यानें चालतांना जोडा फेकून द्यावा लागत असे, अशी याची स्थिति होती. साहेब दवऱ्यावर फिरूं लागले म्हणजे मात्र खांच खळगे माती किंवा मुरुमानें भरीत असतां. यंदा रस्त्याचें दैन्य जाऊन उत्तम काळ्या दगडाची खडी त्यावर टाकून मजबूत केला आहे. तथापि रूळ फिरवून रस्ता दाबण्याचें काम पावसाच्या कमताईमुळें व्हावें तसें झालें नाहीं.

आपला

क्ष.

तारीख १ माहे आक्टोबर सन १८८५.

कसबे जळगांव तालुके मजकूर जिल्हा आकोला प्रांत वऱ्हाड.

रा. रा. वऱ्हाड समाचार पत्र कर्ते यांचे शेवेसी.

वि० वि० आपचा व माझा परीचय मुदलीच नाहीं तरी आपणाकडे ( स्वर्ग लोकीं उलट जमाखर्च या नांवानें ) पत्र पाठविलें आहे; तर त्याचा अव्हेर न होता प्रेमपूर्वक आपल्या येत्या अंकीं सुंदर पत्रीं जागा द्याल अशा हेतूनें पत्र पाठविलें आहे. आपला उदार आश्रय मिळावा.

स्वर्ग लोकीं उलट जमा खर्च—ज्याप्रमाणें सावकारीं जमाखर्चांत एकाच्या नांवानें रकम जमा करावयाची असून, ती चुकून दुसऱ्याची जमा धरली असतां साव कार लोक उलट जमाखर्च करितात त्याप्रमाणें एकां नांवाचीं दोन मनुष्यें असलीं म्हणजे पुढील प्रकार कधीं कधीं घडतो येथील भाविकांचें म्हणणें आहे.

जळगांव हा तालुक्याचा गांव असून ह्याचेच लगत खुर्द जळगांव म्हणून लहानसें गांव वसले असून दरम्यान एक लहानशीं नदी आहे.

त्या खुर्द जळगांवीं खुशाल तेल्याची गुजी नांवाची १०।११ वर्षांच्या वयाची मुलगी ज्वरामुळें कांहीं दिवस आजारी असून २७ तारखेस दिवसाबारावर दोन वाजण्याच्या सुमारास गतप्राण झाली.

चाली—धर्माप्रमाणें सर्व करून सायंकाळीं सात वाजण्याच्या सुमारास शवयनावर तिचे बंधन करून नंतर तिचें तोंडांत तांबूल घालणार तों तिनें आपले तोंड वासलें असें त्या विडा घालणाऱ्याच्या नजरेस आलें.

हा काय चमत्कार झाला तो पहावा, म्हणून त्यानें एक पाण्याचा घोट तिचे तोंडांत घातला. तो घुटकन् वाजलासा ऐकून तो घोट तिचे पोटांत गेला असावा असें त्यास समजल्यावरून त्यानें एकामागून एक असे पाण्याचे दोन घोट घातले तेही पोटांत गेले व कांहीं वेळानें ती सावध होऊन उठून बसण्याचे बेतांत आहे असें पाहून तिला त्या बंधनापासून मोकळे केले त्यासरशी ती लागलीच उठून आपल्या आपण घरांत जाऊन बसली. आणि आपणास नवे वस्त्र नेसविलें असून दारा बाहेरची पाहिली सर्व तयारी कशा करितां केली आहे म्हणून विचारूं लागली.

अहाहा !! यावरून जगन्नियंत्या परमेश्वरा कर्तुत्वलीला किती अगाध आहे !!!

( क्ष )

## खेड्यांतील शिक्षकानें लोकप्रेम कसें संपादावें!

( लिहून आलेला मजकूर)

( ३७ अंकांवरून पुढें चालेल. )

दुसरी अशी एक शंका उत्पन्न होण्यासारखी आहे कीं, मार्कांच्या हव्यासानें मुलें लबाड्या करतील, आणि तत्संबंधीं तकरारी होऊन बराच वेळ मोडेल. यास एक युक्ति आहे, ती अशी. सादिल खर्चांतून दरएक शिक्षकास एक पाटी द्यावी. खालच्या इयत्तांच्या शिक्षकांची पाटी मोठी असून वरच्या शिक्षकांची लहान असली तरी चालेल. क्पाटलागावरील अनुक्रमानें एका कागदाच्या पट्टीवर मुलांचीं नांवें लिहून, ती पाटीवर चिकटवावी. विषय संपतांच मुलांचे मार्क त्यांच्या नांवापुढें खुल्यापाटीवर लिहावे. आणि सरशेवटीं त्यांची बेरीज घेऊन ते क्पाटलागावर लिहावे. तिसऱ्या इयत्ते पासून वरच्या शिक्षकांनीं हें काम क्याटलागावरील पहिल्या नंबरच्या मुलास सांगावें, आणि आपण देखरेख मात्र करावी. खालच्या वर्गांतील मुलें परस्तमंजस असल्यामुळें शिक्षकांनींच हें काम केलें पाहिजे. या पहिल्या नंबरच्या मुलास मानिटर, उपशिक्षक, किंवा मालचाऱ्या असें म्हणतात. यास इतर मुलांपेक्षां थोडा जास्त अधिकार द्यावा व त्याची योग्यताही इतर मुलांपेक्षां अधिक मानावी. म्हणजे ही मानाची जागा मिळण्या करितां पुष्कळ मुलें प्रयत्न करतील.

कोणी म्हणतील, नुसत्या मार्कांबद्दल केवढें लांबच लांब चऱ्हाट लिहिलें आहे. हें न लिहितां एखादा विषय कसा शिकवावा हें प्रश्नोत्तर रूपानें दाखविलें असतें, तर फार बरें होतें. दुसरे म्हणतील, यांत नवें तें काय सांगितलें ! आमच्या येथें ही चाल कितीएक दिवसांपासून आहे. खरेंच, कितीएक इंग्रजी मराठी शाळांतून अशी वहिवाट आहे हें मी ही पाहिलें आहे. परंतु सर्व शाळांतून अशी वहिवाट असेल, असें मला वाटत नाहीं. बरेच ठिकाणीं नाहीं असें मी स्वतः पाहिलें आहे. पहिल्या प्रकारचा आक्षेप घेणारास उत्तर नदेतां वरलिहिले प्रमाणें मार्क देण्याची चाल त्यांनीं सुरू करून पहावी इतकी मात्र त्यांस शिफारस करितों. आतां प्रत्येक विषय कसा शिकविला पाहिजे यांजविषयीं थोड्याशा सूचना अत्यावश्यक होत. व त्या यथावकाश पुढें देण्याचा बिचार आहे. परंतु तूर्त हेड मास्तर यांनीं आपल्या हाताखालच्या असिस्टंटांस यांस कोणत्या रीतीनें वागविले असतां सर्वांस श्रेयस्कर होईल, याजविषयीं थोडे लिहिण्याचें मनांत आहे.

शाळे संबंधीं सर्व काम करण्यांत जर सर्वानुमतें कांहीं व्यवस्था ठरून त्याप्रमाणें कामें होतील तर त्या शाळेचा दिवसेंदिवस उत्कर्ष होत जाईल. हेड मास्तर यांच्या मनांत कांहीं गोष्टी करण्याच्या असून असिस्टंट यांस त्या आवडत नसल्या, परंतु केवळ सक्तीनें हेड मास्तर यांनीं त्यांस त्या करावयास लाविल्या, तर हेड मास्तर यांच्या मनोगता प्रमाणें त्या गोष्टींचा परिणाम होणार नाहीं, बेबनाव होईल; अज्ञान लोक भर रस्त्यांत भांडतांना एकमेकांस ज्याप्रमाणें गालिप्रदानें करितात, व क... कधीं हात घाईवर ही येतात, तसें ...रे- कित्येक शाळांतून घडून आले ...ण्याकरितां सें कांहींकांच्या कानावर असे

रण बहुधा हेड मास्तर यांनीं एक ळीपणानें एखादें काम करणें हें होय. पैशाचा संबंध हा कधीं कधीं कलहास कारणी भूत होतो. म्हणजे समजा शाळेच्या रिपेरा करितां म्हणून हेड मास्तर यांजकडे कांहीं रकम आलेली आहे. हेड मास्तर असिस्टंट यांस न विचारितां किंवा त्यांचा सल्ला न घेतां तें काम करीत असेल, तर हेडमास्तर यांनीं याकामीं थोडाबहुत पैसा खाल्ला असा असिस्टंट यांस संशय येऊन ते बारकाईनें चौकशी करूं लागतात. ही गोष्ट हेड मास्तर यांच्या कानावर गेली म्हणजे त्यांचे मनांत यांच्या विषयीं वांकडें येतें. अशा रीतीनें एकदा वैरभावाचे बीजारोपण झालें, म्हणजे संशयानें संशय वाढत जाऊन, शेवटीं वर सांगितल्या प्रमाणें प्रसंग येतात. सादील खर्च, रिपेरीचा जमाखर्च, डेपो वगैरे संबंधीं काम एक एका असिस्टंटकडे सोंपविलें असतां असले प्रसंग टाळतां येतात. कित्येक हेड मास्तर जावक आवक फाईल आपल्याच टेबलांत गुप्त ठेवितात, असिस्टंट यांस कोणत्या बाबतींत काय रिपोर्ट केला याचा पत्ता लागूं देत नाहींत. अशा रीतीनें त्यांच्या मनांत विनाकारण संशय मात्र उत्पन्न होतो. म्हणून असिस्टंटांपैकीं ज्यांचें अक्षर चांगलें आहे, त्याला आवक जावक संबंधीं सर्व काम करण्यास सांगावें. हेड मास्तर यांचें काम फक्त देखरेख करण्याचें व प्रत्येकास त्याचें काम कसें करावें हें शिकविण्याचें आहे. शिवाय हेडमास्तर यांच्याकडे एक वर्ग असतोच, त्यास शिकविण्याचेंही त्यांचें काम आहे. वरिष्ट अधिकाऱ्यांकडून वेळोवेळीं जे हुकूम झाले आहेत, ते होतील त्यांचा असिस्टंट यांस चांगला समज करून दिला पाहिजे, व त्या बरहुकूम स्वतः आपण वागून असिस्टंट यांस वागण्यास कित्ता घालून द्यावा. कित्येक हेडमास्तर स्वतः मात्र ढीलानें एका तासाने मागून येतात, परंतु एखादे दिवशीं कदाचित् लवकर आले, आणि एखादा कोणी असिस्टंट वक्तशीर हजर नसलेला दृष्टीस पडला, म्हणजे त्यावर रागावतात. तो असिस्टंट किंचित् हजर जबाबी असलाच, तर साफ म्हणेल कीं आज आपण लवकर आलांत म्हणून मला उशीर लागला. ( पुढेंचालेल. )

---

## वसूल.

सन १८८४ जानेवारी पासून आला तो.

रा. रा. जयकृष्ण भोकाशाई अकोलें. ७॥१३

रा. रा. सिताराम रूपचंद पाटील देऊळगांव काळे. १०.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनि हेड मास्तर हाय स्कूल अकोला. ९॥१३.

मेहरबान निजामउद्दीन साहेब असिस्टंट कमिशनर. ९॥१३.

रा. रा. गोविंदराव यशवंतराव तहशिलदार साहेब हल्लीं दारव्हा. ६.

रा. रा. श्रीमंत पंत प्रतिनिधी औंध ९॥१३.

रा. रा. मोतीलाल भगुलाल कलाल ज. ३॥८.

मेहरबान दोराबजी काऊसजी तहशिलदार साहेब मोर्तिजापूर. ९॥१३.

रा. रा. पांडुरंग गोविंद वकील अकोलें. ९.

रा. रा. गंगाधर जोरावरमल साहू अकोलें. ९.

मेहरबान टामस साहेब असिस्टंट कमिशनर बुलडाणा. ६॥१३.

रा. रा. बजाबा रामचंद्र. २०॥८.

रा. रा. राव साहेब श्रीराम भिकाजी जठार. १७॥७.

रा. रा. रामकृष्ण श्रीधर धुडे कारंजा ९॥१३.

रा. रा. बद्रोदिन साहेब तहसीलदार. ९॥१३

मेहेरबान व्हीकाजी साहेब पोलीस सुपिडेन्ट. ९॥१४.

मेहेरबान नबाब सलामुलाखान ज्याहागिरदार देऊळगांव ११॥०.

रा. रा. राजा गणेशलाल साहू नांदेड ९॥१३.

---

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद वद्य १२ शके १८०७

---

## पुस्तक परीक्षा, व्याकरण बोध.

हें पुस्तक रा. रा. केशव आत्माराम क्षीरसागर गिरगांव प्रायव्हेट स्कूलचे शिक्षक यांनीं केलें आहे. याचा साचा दादोकृत लघु व्याकरणा येवढा असून त्यांत ८२ पृष्टें आहेत. पुस्तकाच्या मानानें किंमत दोन आणे आहे, ती ठीक आहे. व्याकरण या विषयावर फारसे ग्रन्थ उपलब्ध नाहींत. तेणेंकरून खालच्या इयत्ता शिकविणाऱ्या शिक्षकांस वारंवार मोठी अडचण पडतें. दादोबा आणि गोडबोले यांचे मोठाले ग्रंथ आहेत ते वाचून त्यांनीं आपले ज्ञान वाढवावें, तर ते ग्रन्थ बरेच दुर्बोध असून त्यांची किंमत ही फार आहे. म्हणून दादोबांनीं आपल्या मोठ्या व्याकरणाचा संक्षेप करून त्यांतील मथितार्थ घेऊन जसें लघु व्याकरण तयार केलें आहे, तसें गोडबोले यांच्या व्याकरणाचे एक लघुव्याकरण पाहिजे होते, तें वरील व्याकरणबोध नांवाच्या पुस्तक रूपानें झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. कांकीं एकंदर अथ पासून इति पर्यंत पुस्तक वाचून पहातां गोडबोले यांच्या व्याकरणाचाच हा मथितार्थ आहे असें बहुतेक मत ठरतें. तथापि गोडबोले यांच्या मताहून कित्येक प्रसंगीं या ग्रंथकारांचीं भिन्न मतें आहेत. जसें गोडबोल्यांचे मतें अकरणरूप म्हणून क्रियापदास असते परंतु प्रस्तुत ग्रंन्थकारास अकरणरूपाची अवश्यकता नाहीं असें वाटतें. दुसरें, बहुतेक सर्वनामांस केशवरावांनीं विशेषणांत सामिल केलें आहे, गोडबोल्यांनीं अशा सर्वनामांत विशेषणात्मक सर्वनामें असें नांव दिलें आहे. केशवरावांना विशेषणें आणि नामें यांत कांहींच फरक ठेविला नाहीं. कांकी विशेषण असून ही ते क्रियेच्या कर्तृस्थानीं येतें असें ते म्हणतात. गोडबोले अशा विशेषणास नाम मानितात. असा जरी मधून मधून भेद आहे, तरी ठोकळ गोष्टिमध्यें केशवरावजीनीं गोडबोल्यांचें अनुकरण केलें आहे. परंतु अनुकरण हा या पुस्तकांत दोष आहे असें आम्ही मानीत नाहीं. एकाच विषयावर दोन तीन ग्रन्थकार पुस्तकें रचूं लागले, म्हणजे कित्येक बाबतींत त्यांचे ऐक्यता होण्याचा संभव असतो; तथापि तेवढ्या ऐक्यतेवरून त्यांनीं अनुकरण केलें असें कसें म्हणतां येईल. येथें गोडबोले यांचें अनुकरण व्याकरण बोधांत केलें आहे, असें सांगण्याचा हेतु इतकाच कीं केशवरावांचीं बहुतेक मतें दादोबा सारखी नाहींत. असो एतावता आजपर्यंत व्याकरण विषयावर जीं पुस्तकें उपलब्ध आहेत. त्यामध्यें एक संख्या जास्ती झाली, हें अभिनंदनीय होय.

सदरील पुस्तकाच्या प्रस्तावनेंत केशवराव म्हणतात, त्या प्रमाणें त्यांचे हेतु कितपत सिद्धीस गेले आहेत, ते आतां पाहूं ते म्हणतात "सांप्रत काळीं मराठी व्याकरणाचीं बरींच पुस्तकें मुलांस सहज समजावीं अशा रितीचीं उपलब्ध आहेत. तथापि त्यावरून ही बहुतेक विद्यार्थ्यांस समजण्याची अडचण पडते; असें माझ्या बहुत दिवस अनुभवास आल्यावरून पूर्वीच्या अडचणी दूर करून हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे."

"मराठी सहाव्या इयत्ते पर्यंत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस मराठींत गद्यपद्य भाषेविषयीं चांगली माहिती असणें अवश्य आहे. हल्लीं रा. ब. दादोबा पांडुरंग यांचें व्याकरण गद्याविषयीं उपयोगीं पडतें. व त्यांतही कित्येक स्थळीं अपूर्णता राहिलेली आहे. ती काढून मुलांस सहज समजेल असें थोडक्यांत लिहिले आहे." इत्यादि. केशवरावांच्या या प्रस्तावनें प्रमाणें व्याकरणबोध हें पुस्तक बहुतेक विद्यार्थ्यांस समजण्या सारखें गद्यपद्या विषयीं सारखें उपयोगाचें, पूर्णता असून थोडक्यांत लिहिलेलें, असें असलें पाहिजे. यां पैकीं किती उक्ति यथार्थ आहेत, तें पाहू.

ज्या अर्थी हें पुस्तक लहान मुलांकरितां आहे, त्या अर्थी जेथें व्यकरण विषयाला आरंभ होतो तेथून म्हणजे आमच्या या वऱ्हाड प्रान्तांत तिसऱ्या इयत्ते पासून तों सहाव्या इयत्ते पर्यंत त्यांचा उपयोग आहे. ज्या मुलांस व्याकरण या शब्दाची देखील ओळख या पूर्वीं कधींच नसते, त्याला 'व्याकरणाचे तीन भाग आहेत, वर्णविचार, शब्दविचार आणि वाक्यविचार' मुख्य स्वरांचीं दुप्पटकरून उच्चार जोरानें केल्यास दीर्घ स्वर होतात, इत्यादि व्याख्यां पासून काय ज्ञान होईल? ह्या व्याख्या मुलांस सहज समजण्या सारख्या नाहींत, हें उघड आहे केशवराव फार दिवसांचा अनुभव असलेले शिक्षक असले, तरी त्यांस मुलांस सहज समजण्या सारख्या व्याख्या कोणत्या हें अद्याप समजत नसावें. किंवा आजपर्यंत त्यांनीं वरच्या इयत्तेंतील मात्र मुलांस शिकविलें असावें, असें दिसतें. कांकीं, व्याकरण बोधाच्या अनुक्रमानें जर तिसऱ्या इयत्ते पासून शिकविण्यास आरंभ केला, तर पहिल्या ३७ पृष्टांतीलच विषय तयार करण्यास विद्यार्थ्यांस व शिक्षकांस अतिश्रम पडतील, असें आमचें अनुमान आहे. परंतु नुसत्या व्याख्या पाठकरून घेणें असतील, किंवा मुलांनीं व्याख्या पाठ म्हणून दाखविल्या म्हणजे शिक्षकाचें समाधान होत असल्यास, कोणास ही फारसे श्रम न पडतां थोड्या अवकाशांत सर्व व्याकरण पाठ होईल, अशा या पुस्तकांतील बहुतेक व्याख्या थोडक्यांत लिहिलेल्या आहेत.

( पुढें चालेल. )

---

# The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 5 1885

## INDIA'S APPEAL TO THE BRITISH ELECTORATE.

The Presidency Association of Bombay, the Sarvajanik Sabha of Poona, the Indian Association of Calcutta, the Mahajan Sabha of Madras and the Sind Sabha of Kurrachee have drawn an appeal to the British electors on behalf of the Indian people. The document is very skilfully drafted. It is free from party principles, is equally applicable to Liberals or conservatives and comprises within a short compass the passing wants and aspirations of the Indian people. The first paragraph alludes to the sacred trust the dependency of India imposes upon England, the unrepresentative character of government, the good fortune of India is passing under the control of the British people whose just and equal laws, educational policy, freedom of thought and action, whose language and literature, systems of local and municipal government and whose desire to advance the material condition of India, to infuse new life into the people and to develop the heterogeneous elements of social life into a homogeneous one have contributed to reconcile the people to the sway of a nation rich with the inheritance of freedom and ages of unimpeded progress. The second paragraph mentions the times and occasions which led to the exercise of efficient control and to the check of the abuses that were now and again discovered in the administration of India. There are the exact stages of progress as given in the appeal "we know how you insisted on the abolition of trade monopolies, when these became incompatible with the discharge of higher trusts, how at each receiving interval, you devised measurers for the promotion of education, and the development of material resources, how you opened the Civil service to competition, how after the great mutiny, you protected our princes and chiefs from threatened destruction and selected a few of our best men to high judicial offices and associated as to some extent in the work of Government as Municipal commissioners, jurors and assessors and

rio. hereal poses the of two or

as [illegible] the Legislative C[illegible]rd paragraph re f[illegible] Asian question w[illegible]ttracted so much att[illegible]and and in connec[illegible]h India nd its inte[illegible]y a very important[illegible] politics of England[illegible] interests in Central [illegible], Egypt, Soudan, South [illegible]nd China all centre round [illegible] for the possession of this [illegible]. The fourth paragraph [illegible] important since it contain[illegible]ary of the wants and gri[illegible]of India that call for more [illegible]diate and sympathetic attent[illegible] than it has till now received. We have extracted it below in extenso and commend it to the careful consideration of our readers:-

"[illegible] pledges most solemnly given [illegible]redeemed, and we have to [illegible] you for their fulfilment. The settlement of the land question on a permanent footing, though ordered by many of the highest authorities twenty years ago, is still as far from being satisfactorily effected as ever it was before. The civil and military services, both convenanted and unconvenanted, remain practically closed to the natives of the country in their higher grades, causing an exhausting and serious material and moral drain on the country. The unequal distribution of the home charges is still unrectified. The industrial development of the country is to a great extent in foreign hands, the Legislative Councils are as unrepresentative as before of native interests. The visitations of famine are unchecked in their severity. The people are disarmed and dangerously demartialized, until the country is deprived of its true defence. The taxes are trenching upon the margin of subsistence, while no national reserve of men or means exists to meet outside attacks, and the practical administration of Government being foreign is naturally to a great extent unudiscerning and unsympathetic. These great evils exist and grow side by side with a keener consciousness on the part of the people of the injustice involved and a diminution of the warm attachment which the Anglo-Indian ruling classes once felt for the people of this country. These elements of weakness at home are complicated by threats of attack from abroad. You will thus see that the situation is as critical as ever it could be, and it behoves you to give thought to it, and enforce the necessary changes which a detailed and thorough enquiry may suggest to your wisdom as necessary.

Our first prayer to you, therefore, is that you will require a pledge from every candidate who seeks your confidence, to the effect that he will, when the next Parliament meets, press for a commission of inquiry to be appointed at once, according to former practice, and also for a periodical repetition of such inquiries hereafter. The present Ministry have admitted the necessity of such an inquiry, and the voice of English public opinion support our demand. Therefore, whatever party comes into power we earnestly pray that you will insist through your representatives that this our first prayer shall be under all circumstances conceded by men of all parties".

The fifth paragraph requires a pledge from every candidate who seeks election to the effect that he will when the next Parliament meets pass for a commission of enquiry to be appointed at once according to former practice and also for a periodical repetition of such enquiries hereafter. The sixth paragraph opposes the imposition of a burden of two or three millions annually in improving the military resources of the Empire, but proposes instead the reorg[illegible]on of the armies of native [illegible], by better discipline and by [illegible]tary instruction and form them into reserves by arming them properly. The seventh paragraph refers to the formation of the large divisions of India into federal states on the lines advocated by the right Hon. Mr. Bright. It teaches the British electors to insist upon Peace Retrenchment and Reform as the conditions under which the candidates will be supported so far as this country is concerned.

The eighth and the last paragraph appeals to the working men of England who have a common interest with the people of this country in avoiding ambitious wars and in developing internal resources. The abolition of slavery the colonization of half the world with the surplus population and their endowment with freedom have achieved eternal glory for the nation. The paragraph concludes by invoking God to help the English people in advancing and elevating the people of this land and bringing them to an equality with the higher status of the British among the civilized nations of the world.

---

As the people of Berars are interested in the administration of the dominions of the Nizam it gives us pleasure to inform our readers that on Thursday the 17th ultimo, the council of state held its meeting at 11 A. M. H. H. the Nizam and all the members were present, The Secretary Syed Husseh Beligrami, alias Mutamim Jung Bahadar, read the proceeding of the last meeting with regard to the investment of the Council with legislative functions, which were confirmed.

"The Nawab Vikar-ul-Oomrah then asked and obtained his Highness's permission to introduce a bill defining the powers of the Legislative Coucil. H. E. the Minister asked and obtained his Highness's permission to introduce a bill to levy wheel and other taxes, ordinarily levied in large towns. The Nawab Fukhr-ul-Moolk gave notice that he would move the reading and passing of the new Limitation Bill at the next meeting. H. E. the Minister asked permission to introduce a bill authorizing the levy of custom duty on all goods imported into his Highness's territory, whether they were for the use of Government, his Highness or the nobles, and others who are at present exempted from the payment of such duties. After some discussion his Highness granted leave for its introduction, remarking that for his own part he was quite willing to pay duty on all goods imported for his use. The Council then adjourned till Thursday, the 1st October."

---

## वऱ्हाड.

काल रात्रौ हस्त नक्षत्राचा पाऊस उत्तम पडला.

येथील नेटिव जनरल लायब्ररींत गेले शनिवारीं संध्याकाळीं ६ वाजतां येथें नवीन झालेल्या बालसमाजांतलि दोन मुलांनीं धैर्य व छत्रपति शिवाजी महाराज या दोन विषयांवर सुरस भाषणें केलीं. भाषण ऐकण्यास गांवांतील बरेच लोक जमले होते. सदर्हू समाज रा. रा. यज्ञेश्वर अनंत वैद्य उर्फ अण्णा हेडमास्तर सिटी म्युनिसिपाल स्कूल अकोलें यांनीं स्थापन केला आहे, यास सुमारे आज ४ महिने झाले. परंतु या वेळपर्यंत कोणास माहीत नव्हतें. हा त्यांचा स्तुत्य उद्योग ज्या वेळीं लोकां पुढें आला, त्या वेळेस सर्वांस आनंद झाला. मुलांचें भाषण संपल्यावर सदर्हू समाज स्थापन करण्याचा उद्देश काय? व हा समाज स्थापन कोणी केला, वगैरेची माहिती रा.रा. गोपाळराव मुलीचे शाळेचे मास्तर, व रा. रा. व्यंकटराव देसाई यांनीं थोडक्यांत सांगून या समाज स्थापकांचे आभार मानून सभा विसर्जन झाली. मुलांस (बक्षिसादाखल) फुलांच्या हारांनीं सुशोभित केलें. पुढील खेपेस "हिंदुस्थानच्या हल्लींच्या स्थितींत अलीकडील विद्वान लोकांचीं कर्तव्यकर्मे" या विषयावर व्याख्यान देण्याचे रा. रा. चिंतामणराव असिस्टंट मास्तर हायस्कूल यांनीं कबूल केलें आहे. अलीकडे व्याख्यानाची मालिका बरीच चालली आहे हें शुभ चिन्ह होय.

बदली—येथील हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर रा. विष्णु पंत डांगे बि.ए. यांची बदली उमरावती हायस्कुलांत होऊन त्यांचे जागीं तळेगांव दशसहस्र येथील हेडमास्तर रा. रा. कृष्णाजी मल्हार पैठणकर यांस अक्टिंग नेमल्याचें समजतें.

तुरुंगांतीलदंगा—येथील तुरुंगांत तारीख ३० सपटंबर रोजी सकाळीं कैदीलोकांची अपसांत मारामारी चांगली होऊन बराच दंगा झाला. तो दंगा बंद करण्यास जमादार गेला असतां त्यास ही न जुमानता जमादारास ही त्यांनीं चांगला हात दाखविला. नंतर पलटणींतील कांहीं लोक जाऊन त्यांनीं तो दंगा मिटविला. या दंग्यांत २ रोहिले व एक भिल्ल होता असें समजतें. जमादारास पाठीवर तर मारलेच मारलें पण सरकारांनीं त्याचे पोटावरही मारल्याचें समजतें.

मे० ज्यु० क० साहेब बहादूर यांची स्वारी गेले आठवड्यांत येथें येऊन सेशनचा मोकद्दमा चालवून परत उमरावतीस गेली.

मे. फिटजलर्ड साहेब डे० क० यवतमाळ हे आपल्या जागेवर रुजू होण्याकरितां येथून यवतमाळास निघून गेले.

पलटण आली व गेली—गेले शनवारीं येथील स्टेशनवर मद्रासी पलटण कामठीहून स्पेशल ट्रेनीनें सकाळी येऊन संध्याकाळीं चार वाजतां स्पेशल ट्रेनीनेंच मुंबईकडे रवाना झाली. एकंदर लोक सुमारें हजार बाराशे असून त्यांची रवानगी इजिप्तकडे झाल्याचें समजतें. त्या लोकांचे सरबराई करितां येथील तहशिदार रा. रा. कृष्णाजी हरी कोल्हटकर स्टेशनवर गेले होते. व लोक ही बरेच मौज पाहण्यास गेल्याचें दिसलें.

येथील हायस्कुलांतील फ. अ. मास्तर रा. रा. हरी रामचंद्र रोहण खेडकर बी.ए. यांची नेमणूक चांदूर येथील तहशिलदारीचे जाग्यावर अक्टिंग झाली असून त्या प्रमाणें त्यांस मे० डायरेक्टर साहेब प्रांत वऱ्हाड यांचे कडून पुण्यास तार ही गेल्याचें समजतें.

---

### नोटीस.

सुमानजी वल्लद मुरहारजी सोनार राहणार वाकोडी ता० पुसद यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे तुम्हाकडे गहाण खताबद्दल कर्जाऊ रुपये मुद्दल ६०० सहाशे व त्याचे व्याज खताचे मित्तीपासून आज तारखेपर्यंत जे एकंदर होईल ते ही नोटीस पावल्या तारखे पासून १५ दिवसांचे आंत व्याज मुद्दल सुद्धां सर्व रकम आदा करावी. न केल्यास रीतीप्रमाणें फिर्याद करून नोटिशीच्या खर्चासुद्धां तुमचे पासून रुपये घेऊं आजपर्यंत दोन वेळां तुम्हास मागणी केली असतां तुम्ही आमचे कडे आले ही नाहींत व रुपयांचा उलगडाही केला नाहीं सबब ही नोटीस देणें आम्हास भाग पडले. कळावें तारीख २१ माहे संपटंबर १८८९ इ०

(सही) धोंडो दामोदर केळकर
मुक्काम गिरोली.

---

### नोटीस.

चरणजीव रामराव पुरुषोत्तम देशपांडे परगणें आकोलें यांसी, खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आकोलें येथील श्री देवीचे उच्छावा बद्दल रुपये २००, दोनशे व बारमाही खर्चा बद्दल रुपये १०० शंभर, व धर्मदावा बद्दल रुपये १०० येकून रुपये ४०० चारशे आमचे हक्कांतून दरसाल घेत अहा; परंतु त्या प्रमाणें खर्च कांहीं होत नाहीं, हल्लीं आश्वीन शुद्ध १ पासून उच्छाह होणें करितां कळविण्यांत येतें कीं, तुम्ही स्वतः खर्च न करितां पंचानु मतें उच्छाहास खर्च करावा त्याचा हिशोब आम्हास दाखवावा. व याच प्रमाणें बारमाही खर्च व धर्मदाव खर्च याचा ही हिशेब द्यावा. असें न केल्यास हल्लीं सालीं आम्ही खर्चा बद्दल तुम्हास पैसा मजरा देणार नाहीं त्या रकमा दिल्या जातात त्या खर्चा करितां आहेत केवळ तुमचे स्वतः करितां नाहींत. असें असतां तुम्ही रकम तुमचे हातांत पैसा आल्या कारणांनीं वजा करून घेतां तो आम्ही वाजवी खर्चाचा हिशेब दाखविल्या खेरीज तुम्हास देणार नाहीं. सालीम रकमेचे दावे करून या नोटीसीचे खर्चासह तुम्हापासून भरून घेऊ. ही नोटीस लिहिली सही तारीख २६ माहे सपटंबर सन १८८९ इसवी.

१ (सही) खंडेराव माधव देशपांडे परगणे मजकूर दस्तुर खुद.
१ नारायण अमृत परगणे आकोलें दस्तुर खुद.
१ निळकंठ जयकृष्ण देशपांडे परगणे आकोलें दस्तुर खुद.
१ रावजी जयकृष्ण देशपांडे तर्फे रघुपत कृष्ण देशपांडे परगणे आकोलें दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

ता. २९ सप्तेंबरच्या आगबोटींतून हैद्राबादचे पांच तरुण गृहस्थ विलायतेस अभ्यास करण्याकरितां गेले. यांत निजामांचे प्रायवट सेक्रेटरी मि. सय्यद हुसेन बिलग्रामी बि. ए. यांचे दोघे चिरंजीव आहेत. वडील चिरंजीव सोळा वर्षांचे असून सिविलसरविस परीक्षेस व धाकटे बारिस्टर होण्यास गेले आहेत. बाकीचे तिघे बारिस्टर, डाक्तर व इंजिनिअर होण्याकरितां गेले असें समजतें.

Per annum in advan
Per annum in a
Six monthly



मुंबई–मि०दादाजी भिकाजी यानें आपली बायको सौ० रखमाबाई [जी मयत डाक्टर सखाराम अर्जुन यांची सावत्र मुलगी आहे )इनें आपले घरीं येऊन रहावें म्हणून येथील हायकोर्टांत फिर्याद केली होती. ह्या फिर्यादीचा निकाल जज्ज पिन्ही यांनीं असा केला कीं, रखमाबाई ११ वर्षांच्या वयाची असतां तिचे आई बापानें तिचें लग्न केलें व हल्ली ती२२ वर्षांची झाली आहे. लग्न झाल्यापासून ती कधींच वादीचे घरीं गेली नाहीं व आतांही ती जाण्यास राजी नाहीं. त्यांतून वादीची स्थिती रखमाबाईचे पाळण पोषण करण्यासारखी नसून त्यास क्षयरोग लागला आहे यास्तव कोर्ट वादीचें म्हणणें कबूल करीत नाहीं. कारण रखमाबाईचें लग्न तिचे आईबापानें ती अज्ञान असतां केलें त्यावरून ती त्याचें करण्यात कायद्याप्रमाणें बांधली जात नाहीं. यास्तव दादीनें उभय तर्फेचा खर्च भरून द्यावा. असा हुकूम केला. आम्ही पिन्ही साहेबांचा न्याय फार पसंत करितो कारण हिंदु लोकांत लहानपणीं लग्नें करण्याची चाल असल्यामुळें पुष्कळ स्त्री पुरुष वयांत आल्यावर दुःखी होतात त्यामुळें योग्य वयांत येतील तेव्हांच त्यांचीं लग्नें झालीं पाहिजेत. ह्याच प्रकारचा एक निकाल दोन वर्षां पूर्वीं मि० डोसाभाई फ्रामजी यांनीं एका माळयाच्या मुली बद्दल केला होता. मि० दादाजी हे अपील करणार आहेत परंतु ते ह्या कामीं विजयी होणार नाहींत हे आम्ही खात्रीनें सांगतों. जर वकील बारिस्टर लोकांस पैसे खर्चण्याचें सामर्थ्य आहे तर त्यांनीं नाखूष असलेल्या बायकोस घरांत आणण्याचे भरीस न पडतां दुसरें लग्न करून सुखानें संसार करावा असें आमचे त्यांस सुचविणें आहे. हीं० वं०

सन १८६१ पासून १८८१ पर्यंत हिंदुस्थानांतील पटकीच्या हकीकतीचें एक पुस्तक पंजाब सानिटरी कमिशनचे डे. सर्जन जनरल एच. डब्ल्यू. ब्ल्यू यांनीं नुकतेंच संपविलें आहे. गेल्या वीस वर्षांत हिंदुस्थानांत पटकीचा कसकसा प्रादुर्भाव होत गेला व हवामानाच्या योगानें त्याचा कसा परिणाम झाला याविषयींची लिहून ठेवलेली हकीकत वाचकांस सादर करावी एवढाच काय तो त्याचा हेतु आहे.

ने० ओ०

चीन देशांत एक अवलिया पैदा झाला आहे असें ट्रायब्यून पत्रावरून समजतें. या अवलियाला शेंकडों कोसांवरील वस्तु स्वच्छ दिसतात, आणि तेथील हालचाल कळते! हा आपला तळहात आरशासारखा डोळयापुढें धरून त्यांतून पाहतो आणि कोठें काय चाललें आहे तें स्पष्ट सांगतों. अनुभवा अंतीं हा अवलिया खरोखर दूरदर्शी ठरेल तर याला आमच्या सरहद्दीवर ठेवावें–म्हणजे रशियाची मसलत समजून व त्याची तयारी कळून इकडे आपल्या पोटांत व्यवस्था ठेवण्याला ठीक पडेल.

मेडिकल [illegible]जांत जाण्यास हल्लीं प्रवेश परी[illegible] (९ आहे ती वाढवून पी. ई. क[illegible]त आहे. या संबंधानें मुंबईच्[illegible]पासून जे लेख प्रसिद्ध झाले आहेत व जो पत्रव्यवहार झाला आहे त्यावरून ही मर्यादा वाढविण्यांत कांहीं फायदा नाहीं असें बऱ्याच लोकांचें मत आहे असें दिसतें.

ज्ञा० प्र०

मुंबई येथील एक्झिक्युटिव इंजीनियर ऑफिसांतील एका उमेदवारानें आपली बढती एकदम व्हावी एतदर्थ कित्येक कारकुनांस विष घालून मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळें सुमारें एक महिन्यापूर्वीं एक पारशी तर मेला व दुसऱ्या एका पोर्टुगीज कार्कूनासही पारशाप्रमाणें वांत्या वगैरे होऊं लागल्या व एके दिवशीं त्यांच्या जेवणास कोणी हात लावला असें वाटल्यावरून त्यानें तें डाक्टराकडे पाठविलें तेव्हां त्यांत सोमल मिसळलेला आढळला, असें समजतें. केवढी बढतीची तृष्णाही!!

तारीख १ अक्टोबरपासून व्हाल्यू पेबल पुस्तकें पोष्टपेड किंवा नाटपेड असलीं तरी आजपर्यंत ज्याप्रमाणें रजिस्टर व्हाल्यूपेएबलला पावती मिळत असे त्याप्रमाणें पावती मिळत जाईल असा ठराव झाला ही व्यवस्था थोड्या किंमतीच्या पुस्तकाची विक्री अधिक व्हावी ह्मणून केली आहे.

बंगालचे लेफ्टेनंट गव्हर्नर युरेशियन व युरोपियन लोकांस सरकारी नोकरी मिळण्यास म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत पसार होण्याची जरूर नाहीं अशा उद्देशाचा कायदा करण्याचा विचार करीत आहेत असें समजतें.

बंगाल इलाख्यांत व्हालेंटियर घोडेस्वारांच्या दोन पलटणी करण्याचा सरकारचा विचार आहे.

बंगाल इलाख्यांत नवा पसार झालेला टेनन्सी आक्ट तारीख १ नोंवेंबर पासून अमलांत येणार.

लंडन शहराच्या पूर्व भागीं राहणाऱ्या १०,००० ऐरिश लोकांची टावर हिलवर सभा झाली होती. तेव्हां ज्या उमेदवारांची मि. पार्नेल शिफारस करतील त्यांचीच पार्लमेंटच्या सभासदांच्या जागीं निवडणूक करावयाची असा ठराव झाला.

इराणच्या सरकारानें आपल्या राज्यांतून परदेशांत धान्य पाठविण्याची मनाई केली आहे.

काबूलच्या अमिरास बालाहिसार किल्ला पसंत पडत नाहीं, यास्तव तो पाडून दुसरा बांधण्याचा विचार सुरू आहे.

सिंगापूर येथें एक २५ फुट लांबीचा अजगर दाखवायास फिरवितात.

बुलाव्गास तारायंत्राचें आफिस स्थापित झालें असें पाहून तेथील व्यापाऱ्यांस अत्यानंद झाला आहे.

कालिकोठ येथें निरनिराळया हजारों जातीच्या पाकोळयांचें एक विलक्षण प्रदर्शन झालें.

हैदराबादेच्या कांहीं भागांच्या उभ्या पिकास उंदीर लागले आहेत.

न्यूयार्कमध्यें इलियन येथील एका कारखान्यांत एक विजेचा दिवा आहे; त्याचा प्रकाश ५०,००० मेणबत्त्या इतका पडतो.

ब्रम्हदेशांत स्त्रियांस सुईणीचें काम शिकविण्यास्तव कित्येक युरेशियन व तद्देशीय सद्गृहस्थ प्रयत्न करीत आहेत.

चीन देशांत दिवसेंदिवस अफूच्या पिकाची लागवड अधिक होत चालली असून खपही वाढत आहे. एकंदरींत परदेशांतून चिनांत जितकी अफू जाते त्यापेक्षां आठपटीवर देशांतच उत्पन्न होतें, व हा क्रम दिवसेंदिवस वाढत जाईल असें म्हणतात.

कास्पियन समुद्राचे पलीकडील भागांत रशियन सरकारचें ४४,००० लश्कर आहे असें ह्मणतात.

महाराज धुलिपसिंग यांनीं अमृतसर येथील शीख लोकांच्या देवालयाकरितां २,००० रु. दिले.

पार्लमेंट सभा तारीख ९ डिसेंबर रोजीं भरणार.

स्पेन देशचें सरकार आपलें आरमार वाढविण्याच्या विचारांत आहे.

मद्रासेंत बाजारांत राहणाऱ्या एका घिसाड्यानें आपल्या बायकोचा लिलांव केला. त्यासमयीं तिची किंमत नऊ पै आली ती त्यानें मोठ्या गांभीर्यानें पतकरली, त्यास लिलांव करण्याचें कारण विचारतां तो असें सांगे कीं ही वारंवार दुसऱ्याबरोबर पळून जात असे या तिच्या कृतीस त्रासून तिचा लिलांव करीत आहे, त्या समयीं एक इंग्रजी शिकलेला गृहस्थ तेथें होता. ती अत्यंत सुस्वरूप होती व तिच्या नवऱ्यानें तिची किंमत पतकरतांच ती लिलांव घेणाराबरोबर चालती झाली असें साउथ इंडिया आबझरवरमध्यें खात्रीलायक समजलेल्या बातमीवरून प्रसिद्ध झालें आहे.

इंग्लंडांत पालमाल ग्याझेट कर्त्यांनें तेथील तरुण स्त्रियांस दुराचारास जे लोक प्रवर्तवितात त्यांविषयीं लेख प्रसिद्ध केल्यामुळें तेथें तरुण स्त्रियांचें कुमार्गप्रवर्तकांपासून संरक्षण व्हावें एतदर्थ उत्तम कायदा झाला असें पाहून आपल्याकडेही कधीं कधीं कांहीं अनाथ लोक दुष्काळ वगैरे पडला असतां किंवा अशाच कांहीं अनिवार्य प्रसंगीं आपल्या अज्ञान कन्या वेश्यास विकतात असें आढळतें त्यांच्या संबंधानें कायदा व्हावा एतदर्थ उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं प्रांतांचे लोक प्रयत्न करीत आहेत. परंतु अशा प्रकारचा कायदा करतांना वर सांगितल्याप्रमाणें सर्वस्वी अनाथ झालेल्या मुलींचें चांगल्या रीतीनें संगोपन होऊन त्यांस उत्तम शिक्षण मिळण्याविषयीं योग्य रीतीची तजवीज झाली पाहिजे असें लोकांनीं व सरकारानें लक्षांत ठेविलें पाहिजे अशी आमची सूचना आहे. सु०प०

नाशिकचे रहाणारे सय्यद सिराजुल्ल हसनखान हे आजपर्यंत निजामच्या दरबारांत अंडर सेक्रेटरीच्या जागीं होते त्यांस आतां त्या सरकारानें आपल्या राज्यांत इनाम कमिशनर नेमिले असून ही नेमणूक चांगली झाली असें ह्मणतात.

निझाम हैदराबादच्या एका गोऱ्या कामदारानें लांच खाल्ला असें दुसऱ्या एका गोऱ्याचें ह्मणणें असून त्या बद्दल लवकरच एक खटला कोर्टांत येणार आहे असें ह्मणतात, अपसांत लेखालेख सुरू झाली तरच असल्या गोष्टी बाहेर येण्याचा संभव आहे.

निझामच्या हद्द[illegible] वर म्हणजे खुद्द नि[illegible]ला: कांहीं माल येत अस[illegible]तां जरी जकात घेण्यांत येण[illegible]त्यावर ही एक कायदा करीत [illegible]निझामसरकार [illegible] ठा. अ.

विद्याखात्याचे ह[illegible] क्टर डे फार ब्रह्मद्वेषी [illegible] अविंटग डायरेक्याझीट मध्यें, सरकार[illegible]सतात. कालच्याच्या व पगारी विद्या[illegible]शाळांतून नादारीमान व ख्रिश्चन व[illegible]वरील जागा मुसलदेण्या विषयीं सक्ती[illegible]व [illegible] नादारीच्या जागा भरते वेळीं तसा मुलगा नच भरल्यास ती जागा तशीच रिकामी राहूं द्यावी. असें साहेब बाहदुरांनीं ठरविलें आहे. वरिष्ट जातीचे संबंधानें सरकारी अधिकाऱ्यांचे लक्ष असें कां फिरत चाललें, कोण जाणे?

कलकत्ता येथील बाबू मन्नोलाल यांणी तिकडील शाळेंतील विद्यार्थ्यांस उत्तेजन देण्या करितां ६२,००० रुपयांची उदार देणगी दिली असून त्या रकमेचे वार्षिक व्याज २,६,०० रुपयांतून ठिकठिकाणीं शाळांतील विद्यार्थ्यांस त्यांच्या नावच्या स्कालरशिपा देण्या बद्दल सरकारांनीं ठरविलें आहे.

पुण्यास रोहिल्यांनीं कांहीं दरवडे घातल्या मुळें तेथील पोलीसच्या लोकांनीं सुमारें तीस रोहिल्यास पकडले आहे.

अमंगलवृत्त— या आठवड्यांतून बाँबे ग्याझेटांतून असें एक वृत्त प्रसिद्ध झालें, कीं, सरकार पैशाच्या अडचणीमुळें आणि खर्चाच्या चणचणीमुळें पुणें येथील डेक्कन कालेज बंद करून त्यांतील प्रेफेसर मंडळी मुंबईच्या एल्फिस्टन कालेजांत नेमणार. ईश्वर ही असंगल वार्ता असत्य व निराधार अशी करो. न्या.सिं०

## तयार आहे.
## हिंदुधर्मशास्त्र भाग १वर.

( दुसरी आवृत्ति )

नामदार रा. सा. वि. ना.मंडलीक सी.एस्. आय्. यांचे.

किंमत८रुपये व हांशील आठ आणे.

पत्रें (किंमतीसुद्धां)ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्री साठीं ठेविलीं आहेत. व०स०कर्ते०

## स्त्री पुरुष तुलना.

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ०ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तक पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें येथील रा.रा.बापुजी हरी शिंदे हेडक्लार्क, मि. डे० कमिशनर यांजकडेस, व आकोलें येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे. पुस्तक घेणारास टपाल हांशील पडणार नाहीं. पैसे पाठविणारानें वर्तांळया सुद्धां पाठवावे.

☞ हें पत्र आकोला येथें के.बा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

... आगाऊ रु० ५ डाक हाशील ०।२
सहा माही ,, ३ ,, ,, ०८
साल अखेर ,, ७ ,,
फिरकोळ अंकास.........................०४

Per annum in advance ... 13 as
Per annum in arrears 7 ,, 1 R 8as
Six monthly............ 3 ,, 8 as
single copy.................................4 as



नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL XIX AKOLA MONDAY OCTOBER 12 1885 NO 40

पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख १२ माहे आक्टोबर सन१८८५ इ० अंक ४०



PHOTOGRAPHS! PHOTO GRAPHS!!

*IMPORTED direct from the Continent. Artistic Studies from Life, Classical and Mythological undraped Figures, Statuary, Sacred and Secular Photo graphs, Portraits of Celebrities, Pretty Women, English and French Actresses, Selections sent out on approval on receipt of deposit of 10 s. and upwards. Price Lists and complete Catalogues post free. Address, Continental Novelty Co., 50 Leicester square London, England. The trade spplied.*


## पक्षकार लोकांस फार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए एल. एल. बी. मुंबई हायकोर्टाचे वकील हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचें हापीस "वऱ्हाडसमाचार" छापखान्याशेजारीं काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८४ इ० } पत्रकर्ते.

### नोटीस.

रा. शिवलाल गुलाबचंदजी वहिवाटदार रामभजनजी साहू दुकान कसबे तेल्हारें यांस खालीं सही करणार यांजकडून कळवितो कीं दस्तऐवजांत तुम्ही मोडतोड केली म्हणून नोटिशींत लिहिले त्यास जो दस्तऐवज झाला तो गहाण मालावरच झाला स्वतः जातीवर आपले कडून अदाई होणार नाहीं म्हणूनच तुम्ही तारणमाल लिहून घेतले व जातीवर देऊं या अक्षरास तुमच्या समक्ष काट देऊन मोडले आहेत त्या नंतर दस्तऐवज रजिष्टर केलें आणि तुम्हास दिले त्याजला दीड महिना झाला आतां हल्लीं कळवितों कीं दोन्ही दस्तऐवजाचे रुपये २९०७ याचा दावा करून रकम घेतली जाईल. हें लिहिणें बरोबर नाहीं दस्तऐवज जो लिहून दिल्याप्रमाणें फेड करण्यास कबूल आहों व तुम्ही ही कबूल केलें असतां हल्लीं फिर्याद करून रुपये घेणें हें तुम्हांस उचित नाहीं व मी ही एक वेळां दस्तऐवज करून दिले आतां दुसरा दस्तऐवज करून देणें हें मजला नीट दिसत नाहीं याजवर आपण पाहून वर्तणूक करावी ह्या नोटिशीच्या खर्चा सुद्धां आखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान होईल तें भरून द्यावें लागेल कळावें हे विनंती ता. ०-१०-८५इ०

( सही ). चिमणाजी रामचंद्र कुळकर्णी तेल्हारे खुर्द दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मूर्तिजापूर ता. ६।१०।८५ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस,

**पर्जन्य**—हवेंत थंडीचे दिवस समीप आल्यासारखीं चिन्हें दिसत होतीं. सकाळीं थोडी थंडी पडून दंव पडत असे आणि दिवसभर ऊन्ह कडक तापत असे पाऊस न पडण्याचीं हीं चिन्हें आहेत असे सर्व लोकांस वाटून ते काळजींत पडले होते. इतक्यांत ता. ४ रोजीं सायंकाळ पासून पावसाची थोडी बुरबुर सुरू झाली, आणि कालच्या रात्रीस तर दोन तीन चांगल्याच सरी येऊन रेलचेल झाली. रबीचा पेराही सुरू होऊन ४ किंवा ५ दिवस झाले. एकंदरीनें अद्याप पावेतों शेतकरी लोकांस मागील सालचें नुकसान भरून येण्याची आशा आहे.

**अ० क० कोर्ट**— मि. विश्वनाथ नारायण दांडेकर यांच्याकडे आमच्या येथील कोर्टाचें अधिपत्य आल्या पासून अनेक प्रकारें सुधारणा झाली व होत आहे. कारकून व वकील यांस आतां नित्य पहाटेस उठून दहा वाजण्याचे आंत भोजनादि नित्यकर्में गाटोपावीं लागतात. पक्षकार व साक्षीदार यांस आतां ज्या तारिखेचें व ज्या वेळेचें हजर होण्या विषयीं निमंत्रण असेल, त्याच तारिखेस व त्याच वेळेस हजर झाले पाहिजे असें त्यांस समजूं लागलें आहे. रोज जें काम नेमिलेलें असतें, तें सहसा पुढील तारिखेवर लोटण्याचे प्रसंग आतां पूर्वीं इतके येत नाहींत; तेणेंकरून वकिल लोकांस प्राप्ती ही अधिक होत आहे. आणि लोकांस सर्व प्रकारें सुख झालें आहे.

**अपघात**—या गांवच्या आग्नेय दिशेस गांवा शेजारीच येथील प्रसिद्ध सावकार घाशीराम यांणीं ४ किंवा ५ वर्षांपूर्वीं पांच सात हजार रुपये खर्च करून एक तलाव बांधिला आहे. परंतु त्या पासून अलीकडे फायदा किंचित् ही न होतां उलटें नुकसान होऊं लागल्याचे बोभाट वारंवार सरकारच्या कानापर्यंत गेले. आणि तलाव फोडून काढण्याचा हुकूम होऊन एका बाजूनें पाणीं जाण्यास मार्ग काढून दिला आहे तरी दुसऱ्या एका कोपऱ्यांत सुमारें पुरुष दिडपुरुष पाणी राहण्या सारखा एक खळगा राहिला आहे. त्यांतच गेल्या शनिवारी तिसऱ्याप्रहरीं अपघातानें एक मनुष्य प्राणास मुकला. त्याची हकीकत अशी आहे की आनंदा नांवाचा साळी जातीचा एक इसम उमर वर्षे ५० गुरें राखीत असे, त्याची एक म्हैस सदरील तलावांत गेली होती. तिला बाहेर काढण्याकरितां आनंदाचे खेळगडी दुसरे गुराखी प्रयत्न करूं लागले. त्यांस आनंद्यानें तुम्हांस पोहतां येत नाहीं, तुह्मी मराल असें ह्मणून निवारण केले. स्वतः आनंद्यास ही पोहतां येत नव्हतें; शिवाय त्याचा एक पाय आणि एक हात अर्धांग वायूनें किंवा [illegible] रोगानें अगदीं लुले होते [illegible] ह्मशी करितां पाण्यांत जातां जातां बराच दूर गेला आणि पाय सुटून बुडून मेला.

हा तलाव अगदींच निरुपयोगी असून त्यांत आजपर्यंत ५।६ मनुष्यांचे बळी पडले आहेत म्हणून सरकारानें तो बुजवून टाकून जमीन दोस्त करून टाकावा। अशी गांवांतील लोकांनीं अथवा येथील अंमलदारांनीं शिफारस करावी.

**गांवांतील रस्ते**--आज दोन चार वर्षांत कधींच दुरुस्त न झाल्यामुळें पाण्यानें धुपून जाऊन जागोजाग खळगे पडले आहेत. गटारें रस्त्यांतील माती गेली ह्मणजे ती पुन्हां उपसून माती रस्त्यावर टाकावी आणि दरसाल या कामीं बरीच रकम अंशतः मातींत घालावी, या वांचून आमच्या लोकल कमिटीनें २।३ वर्षांत दुसरें काय केलें असेल. तें कमिटीसच ठाऊक!

क्ष.

## खेड्यांतील शिक्षकानें लोकप्रेम कसें संपादावें!

(मागील अंकावरून पुढें चालू. )

हेडमास्तर तापसी असलेह्मणजे एवढ्या वरूनच द्वंद्वास आरंभ होईल. शांतस्वभावाचे असलेतर उपदेश मानून आपली चूक दुरुस्त करतील. असिस्टंट यांस कधीं कधीं घरगुती कामासंबंधीं किंचित् उशीर झाला असतां त्यांस निष्ठुर वचनांनीं ताडण करणें, किंवा त्यांचा रिपोर्ट करणें अगदींच न्याय होणार नाहीं. कारण त्यांस जितके वेळां उशिर होत असेल, त्याच्याहून जास्त वेळां ते लवकर येत असतात. तेव्हां एकंदरीनें ते आपलें कर्तव्य बजावितात, यांत तिळमात्र संशय नको. इतकें खरें आहे कीं जो नित्यच उशीर करणारा आहे, त्याजला समज मिळाली पाहिजे व तो न ऐकेल तर त्याचा रिपोर्ट ही होणें इष्ट आहे. असिस्टंट यांनीं लवकर शाळेंत हजर असले पाहिजे असें करणें अभ्यास खुद्द हेडमास्तर यांनीं तसा कित्ता वळविला पाहिजे. आणि मुलांस लवकर येण्याची संवय लागण्या करितां शिक्षकानें लवकर आलें पाहिजे. यां शिवाय इतर उपायांनीं वरील हेतु कदापि सिद्धीस जाणार नाहींत.

सरक्युलर हुकमाप्रमाणें म्हटलें ह्मणजे कोणताही असिस्टंट गैरहजर असल्याचे त्याचा हेडमास्तर यांणीं रिपोर्ट करावा आणि हेडमास्तर गैरहजर असतां पहिल्या असिस्टंटनें त्याचा रिपोर्ट करावा असें आहे. परंतु कांहीं तास पर्यंत एखादा असिस्टंट निकडीच्या कामाकरितां म्हणजे जसें श्राद्धपक्ष, घरांतील माणसास औषधपाणी स्वतःची प्रकृति बिघडणें इत्यादिकांकरितां कांहीं तासपर्यंत, किंवा अर्धा किंबहुना एक दिवस पर्यंत देखील हेड मास्तर यांस कळवून गैर हजर झाला असतां त्याचा त्यांणीं रिपोर्ट करावा हें चांगलें नाहीं. हें हुकुमाच्या विरुद्ध वर्तन आहे, असें कित्येक हेड मास्तर प्रतिपादन करितील. त्यास माझे असें सांगणें आहे कीं कायद्यांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ लावीत बसण्यापेक्षां, कायद्याचा हेतु पाहून तदनुसार वर्तन ठेवणें हें विचारी मनुष्याचें कर्तव्य आहे. वर जो हुकुम सांगितला आहे, त्याचा हेतु इतकाच आहे, कीं शिक्षक लोकांनीं वारंवार खानगी कामानिमित्त आपल्या कर्तव्यास अंतर देऊंनये; या हेतुप्रमाणें प्रत्येक शिक्षकाचें वर्तन आहे किंवा नाहीं हें पाहणें हेड मास्तरचें काम आहे. आतां वर सांगितलेंच आहे, कीं हेड मास्तर यांनीं स्वतः मात्र होईल तेथपर्यंत वर असिस्टंट यांस सांगितलेल्या सवडीचा उपयोग करूं नये. म्हणजे असिस्टंट ही फार करून तसें करणार नाहींत. अकबर बादशहा आपल्या शत्रूंनां क्षमा करून त्याजवर उपकार करीत असें, तथापि त्याचे शत्रूं वाढले नाहींत; व अवरंगझेब आपल्या शत्रूस कडक शासन करीत असे, तथापि त्याचे शत्रु कमी झाले नाहींत; या कडे लक्ष पोंचवून प्रत्येक हेडमास्तर प्रसंग विशेषीं क्षमाशील होतील, तर कडक पणानें वागण्या पेक्षां ही त्याचे काम उत्तम रीतीनें चालेल यांत अगदीं संशय नको.

असिस्टंट समंजस असला म्हणजे हेडमास्तर किती जरी कडक असला, तरी त्यास तो कडकपणा न भासून उत्तरोत्तर अधिकाधिक चांगलें काम करूं लागेल, व तो हेडमास्तराच्या कडकपणा बद्दल कधीं ही गिल्ला करणार नाहीं. कारण तो असें समजतो कीं, हेडमास्तर जरी प्रथम दर्शनीं आपणांस कडक वागवितात असें दिसतें, तरी परिणामीं त्या कडक पणानें आमचेंच हित होतें, व आमचें हित झालें म्हणजे पर्यायानें हेडमास्तराचें ही हीत होतेंच. अविचारी शिक्षक मात्र नवशिक्या बैला प्रमाणें कांहीं दिवस दांडगाई करील, तरी कालांन्तरानें त्यास वळण

इंगा फिरला म्हणजे तो ही आटोक्यांत येईलच. असिस्टंटच्या आंगीं आज्ञा धारकपणा हा गुण मुख्यत्वें करून असला पाहिजे. एखादे वेळीं हेडमास्तर यांनीं एखादा अन्यायाचा हुकूम केला असतां ही, ह्यास तत्क्षणीं उद्धट पणानें उत्तर न देतां, कांहीं काळानें काय अन्याय झाला हें त्याच्या नजरेस येईल असें करावें; एकंदरीनें एक मेकांनीं एकमेकांचा बोज राखून हातीं घेतलेले कामीं यशस्वी व्हावें, आणि आपले शाळेची कीर्ति दूरवर जाईल, अशी हिंमत बाळगावी.

( पुढें चालेल. )

वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन शुद्ध ४ शके १८०७

## पुस्तक परीक्षा, व्याकरण बोध.

(मागील अंकावरून पुढें चालू)

'जे शब्द नामाच्या आंगचा गुण न दाखवितां आपला स्वतांचा गुण दाखवितात, अशा कांहीं शब्दांस सर्वनामें म्हणतात या व्याख्ये पासून मुलांस तर काय पण व्याकरण शिकविणारे शिक्षकांसतरी कांहीं बोध होईल काय? ही व्याख्या कोणत्या शब्दांस लागू होत नाहीं? घोतर, कागद, वाहवा, परंतु इत्यादि शब्द नामाच्या आंगचा गुण न दाखवितां आपल्याच आंगचा गुण दाखवितात, म्हणून यांस सर्वनामांत गणितां येईल काय? आमच्या मतें केशवरावांस सर्वनाम म्हणजे काय हें स्वतः शिकलें पाहिजे आहे. कांकीं एतद्विषयीं त्यांच्या अज्ञाना मुळें असा, तेवढा, जसा कसला इत्यादि शब्द दिसण्यांत विशेषणा सारखे दिसत असून व प्रत्यक्ष ते विशेषणां प्रमाणें नामाचा गुण दाखवित असतां ही त्यांस सर्वनामांतच कां गणिलें आहे, हें त्यांस समजावयाचें नाहीं.

इतर व्याकरणांत भाववाचकनाम म्हणून नामाचा एक प्रकार मानिला आहे; परंतु केशवरावांस तो पसंत नाहीं. याचें कारण ते असें देतात कीं 'जर प्रत्यया वरून नामाचा प्रकार केला, तर साधित प्रकरणांतील सगळीं नामें नामाचे भेद मानावे लागतील आणि सर्व घोटाळा होईल.' आमच्या मतें घोटाळा होईल, तो टाळण्याचा प्रयत्न करीत असतांच केशवरावांनीं आपलाच घोटाळा केला आहे. कांकीं जर त्यांनीं किंचित् विचारदृष्टीनें इतर व्याकरणाचीं पुस्तकें अवलोकन केलीं असतीं, तर त्यांस तेव्हांच समजलें असतें कीं भाववाचक नाम हा प्रकार प्रत्ययांवरून मानिलेला नाहीं अर्थावरून आहे. सामान्यनाम म्हणजे अनेक पदार्थांस जें एक नांव लागतें, तें; विशेषनाम म्हणजे जें नांव एकाच पदार्थाला लागतें, तें; भाववाचक नाम म्हणजे जें सामान्य आणि विशेष नामा प्रमाणें पदार्थाचें नांव नसतें, तर पदार्थांतील गुणाचें नांव असतें. असा बोध इतर व्याकरणांतून स्पष्ट होत असतां केशवरावांचा घोटाळा कां झाला हें त्यांचें त्यांसच माहीत.

विभक्ति प्रकरणीं सप्तमीचा त प्रत्यय न देतां केशवरावांनीं आंत हें शब्दयोगी अव्यय मानिलें आहे, जसें घर + आंत= घरांत. आणि झाड शब्दाचीं सर्व विभक्तींचीं रूपें देतांना सप्तमीचेरूप मुळींच दिलें नाहीं. झाड शब्दासारखे अनेक शब्द आहेत, त्यांचीही केशवरावांच्या म्हणण्या प्रमाणें सप्तमीचीं रूपें येणार नाहींत. असें न करितां, पंचमीचा तून आणि सप्तमीचा त हे प्रत्यय लावतांना मागील अक्षरावर अनुस्वार दिला पाहिजे असें म्हटलें असतां कांहीं चिंता नव्हती. नदींतून येथें नदी + आंतून अशीं पदें निघत नाहींत, तेव्हां नदींतून ही जर विभक्तिनव्हे तर काय आहे हें व्याकरण बोधांत आम्हांस सांपडत नांहीं.

सहाय धातूंमध्यें राह, वस, दे, पाह, इच्छ हे धातु गणिले आहेत. परंतु असें न करितां हे धातु लागतांना मुख्य धातूचें जें कृदंत होतें, त्यास अव्ययी कृदंत मानून राह, वस इत्यादि हीं क्रियापदें समजावीं हें चांगलें. काळ विचारांत केशवरावांनीं तृतीयपंथ काढिला आहे. जी क्रिया चालूं काळाच्या संबंधाची आहे, ती वर्तमान काळची, जी गेलेल्या ( भूत ) काळाच्या संबंधाची, ती भूत काळची क्रिया, आणि येणाऱ्या काळाच्या संबंधाची जी क्रिया ती भविष्यकाळची असें धोरण ठेवून दादोबांनीं काळांचे निरनिराळे प्रकार मानिले आहेत, केवळ स्वरूपावरून मानिलें नाहींत. जे वाक्य चालूं काळाच्या संबंधाचें, त्यांतील क्रियापद वर्तमान काळचें, जें वाक्य भूतकाळाच्या संबंधाचें, त्यांतील क्रियापद भूतकाळाच्या संबंधाचे, आणि जे वाक्य येणाऱ्या काळाच्या संबंधाचें, त्यांतील क्रियापद भविष्याकाळाचें अशा धोरणावर गोडबोल्यांनीं काळांचे प्रकार मानिले आहेत मीं घर बांधिलें आहे, हें वाक्य वर्तमान काळाच्या संबंधाचें आहे, तथापि त्यांतील क्रिया बांधणें वर्तमानकाळची नाहीं. क्रियेचें फळ किंवा परिणाम अद्याप आहे, तथापि क्रिया मागेंच होऊन गेली; अशा सूक्ष्म विचारांनीं या उभय वैयाकरणांत भेद पडला. केशव रावजींनीं नुसत्या बाह्य स्वरूपावरून काळांच्या प्रकारांचा निश्चय करून तदनुरूप नांवें दिलीं आहेत. हीं नांवें मुलांस ध्यानांत ठेविण्यास फार सोईचीं आहेत.

पान ७७ यांत 'रामास तसें करणें भाग पाडावें' तसें याचें व्याकरण अगदीं चुकींचें आहे. तेथें तसें हें विशेषण कदापि होणार नाहीं. कां कीं तसेंच्या जागीं काम शब्द घातला असतां, काम हे विशेषण करितां येईल काय? पान ७८ 'तुमचें चांगलें होवो' येथें चांगलें हें विशेषण मानून होवो याचा कर्ता केला आहे. याजपेक्षां चांगलें हें कल्याण या अर्थी नाम मानिलें असतें तर फार चांगलें होतें.

असो एकंदरीनें या पुस्तकांत ही बरीच दुर्बोधता राहून लहान मुलांच्या तादृश उपयोगाचें नाहींसें झालें आहे. पुस्तककर्त्याचे प्रस्तावनेंतील हेतु सर्वांशीं सिद्धीस गेले आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि वर दाखविलेले व दुसरे जे कांहीं दोष यांत असतील, ते वजा जातां बाकीचें पुस्तक लोकाश्रयास पात्र आहे, यांत संशय नाहीं.

The Berar Samachar
MONDAY, OCTOBER 12 1885

## OUR PLACE IN THE POLITICS OF OUR RULERS.

(Continued from our issue of the 28th. Septr.)

The position of one who professes to be a public man and a defender of the rights of the people, is thus evidently an undesirable one; and yet the inclination to serve one's country and the force of the surrounding circumstances lead a few persons away from the ordinary groove.

Papers like the Times of India are always loud in the declamation of 'the noisy notoriety' which educated natives want to attain by political agitations. The educated natives have a good deal lying heavy on their hands, in doing away with the enormous mass of obsolete customs that overburden and oppress the present Indian society. As to politics, it may be let alone. Men like Lord Reay join in saying that many persons who criticise the action of Govt. in this country, hardly know much about it. Now even supposing, for the sake of argument, that those who criticise Government know very little about it, the fault, it will appear is that of the Government. If the Presidency Councils were made more representative of the advanced public opinion of the native community, if in fact the Government did ever care to make the objects of all their acts made known, and keep harmony with the ever advancing aspirations of the people, we are sure there will be the least cause for complaint either for the people or the Government. The public press in India which represents the educated native community of this country, does not cry aloud the grievances of the public from the capricious motive of crying down the Government any how and the criticism is not based on purely national grounds, but has some tangible basis.

There is one thing, which, as we have already stated keeps the Government safe in all its doings; and that is the want of a check in the form of a healthy public opinion. Indeed the fact is recognized by Government and often hurled successfully against any suggestion of the native Press. The public opinion, they say, is the opinion of an educated minority and the Government cannot be sure that the native Press correctly represents the actual feelings of the native community. To this it is a sufficient answer to say that in all civilized countries and even in England, those that are more advanced lead the masses; it is they that form and mould the opinions of the mob. The mob itself has always been a sluggish sort of inert body which has to be led. In matters of politics and indeed in all matters involving work of the brain, mere numbers are of no avail; the opinions of the advanced men can alone be considered. In England, for instance, the advanced men who are connected with the public press and represent the public opinion are a limited set, who while they profess to *represent* public opinion, do *guide* it and mould it. It is absurd to suppose that these gentlemen actually gauge the opinion of the public before giving expression to it. As it is in England and elsewhere, so must it be here in India; and there is one further very cogent reason why the opinion of the educated minority must be taken to represent correctly the public opinion. The masses here are so apathetically indifferent to the mode in which Government is conducted, that those who deserve better (*i. e.* the educated minority) must also suffer the same evils with them, unless they make themselves heard, and get redress for themselves and the masses who hardly understand their own interests. It must also be remembered by those who in this country are charged with the good conduct of Government, that the educated minority have wherewithal to annoy the Government in case they are not heard. The lessons of the French Revolution have already taught the world what evils can be inflicted on the Government by literary persons who have no other channel in which to let their powers flow, than rousing the mob. What political opinions were tossed up and down the French coffee-houses, and what tremendous effect was produced thereby, is too well known to bear repetition. It therefore behoves the authorities to think well of the possible consequences, before rejecting off hand the opinions of the educated minority. (to be continued)

## THE PLEADER'S EXAMINATION.

The Berar Pleadership Examination, which is annually held in Amraoti commenced this year on Monday, the 5th. instant and ended on the 7th. instant. The papers were, on the whole, tolerably fair but there is one thing to be remarked in connection with them that their nature was such as would require a greater amount of cramming than sound legal knowledge. There ought to have been some such questions as would have enabled the examiners to test the soundness and accuracy of the legal knowledge which the candidates possessed. To increase the real efficiency of the bar, Berar really wants such Pleaders who are firmly grounded in law and not such who have simply stuffed their minds and burdened their memories with a number of sections from the law books appointed for the examination. Another important thing which prominently suggests itself to our mind in connection with the examinations is that there prevailed some mismanagement. In any University Examination in Bombay candidates are assigned seats with their names and numbers labeled on them in the alphabetical order of their surnames

and these seats candidates are, on no account to leave off till the end of the examination. We deeply regret to observe that there was no such order in the late examination. There were no seats assigned to candidates, which they should stick to, till the examination was over. They frequently changed them to their own convenience and at their own will.

In any Bomby University Examination, in addition to the number of examiners there are paid supervisors, whose duty is simply to make a strict and vigileut superintendence. Here in the late examination the work of supervision was very loose as will be clearly evidenced by the expulsion of one candidate from the examination hall on the suspision of copying. This evil, the authorities, will, we hope, provide against next year. There happened one curious incident in the examination, which clearly gives us an idea of the culpable degree of carelessness on the part of the examiners. On the last day of the examination some afternoon papers on Specific Relief Act & were distributed through mistake to a few candidates along with the Morning papers giving thereby an occasion to some to play mischief. It is our belief that the due preservation of order and regularity in the matter of conducting examinations evinces a sense of high responsibility that rests upon the examiners.

In connection with the said examination we hear that authorities in Berar are soon going to admit outsiders to this examination on certain restrictions. Viewing the question from a higher point of view, we do not see the propriety of placing any restrictions. The mischievous tendency of such restrictions is to weaken competition and competition being weakened no candidate of superior abilities could come in. This would seriously impede the improvement of the local bar, the judicial branch of the administration and consequently the higher interests of the province. If they think any restrictions at all necessary they must not be as severe and hard as those in Central Provinces. Before taking any definite action in the matter they out to invite public discussion on the advisability of the step. We, therefore, reserve our further comments on the subject.

---

On the last Saturday Mr. Chintaman Rao, the Assistant Master in the Akola High School read a short lecture on the "duties of the educated Natives of India." The scope of the subject being rather extensive the lecturer could not be expected to treat it exhaustively. On the whole, however the attempt was not altogether a poor one. The discussion that followed the lecture was rather unusually animated and unpleasant. Mr. Desai made a wholesale attack against the educated natives. Mr. Bhagwat answered the attack and criticised the lecturer curiously arguing as if in the age of discussion there should be no action. Mr. Bhagwa misunderstood the lecturer on a certain point to comment on which we do not think necessary. Mr. Mahajany, our able and respected leader followed Mr. Bhagwat and made comments rather in a vehement tone. His statements on the occasion, were somewhat dogmatic and were no more than the forcible exposition of Mr. Bhagwat's views. We expected that Mr. Mahajani would treat the whole subject in all its relations, but we regret to find that the audience in general was disappointed as the discussion entered a strange phase of party spirit. Other speakers made what suggestions they thought proper. Some of the speakers did not pay strict attenitoh to order. The subject for the next lecture is the "future of India."

---

We take the following from the *Bombay Gazette*.:- "Rumour is rife in Berar that Mr. Cordery, C. S. the Resident at Hyderabad, will proceed on furlough almost immediately. Sir Lepel Griffin, K. C. S. I., and Mr. Leslie Saunders, C. S., Revenue Commissioner H. A. D. (Berar) are spoken of as likely successors. should the latter succeed to the post as is most likely, Colonel Bell (M. S. C.), Judicial Commissioner H. A. D. will probably be appointed to the charge of the Revenue Department."

---

Mr. Quintin Byran has been appointed Assistant Police Superintendent in H. A. D. and is posted to the Akola District. He resumed his duties in the last week.

---

## वसूल.

सन १८८९ जानेवारी पासून आला तो.

रा. रा. रामराव गोविंद असीस्टंट कमीशनर. २०

रा. रा. ज्यालमसींग वल्लद मानसींग रजपुत सुनगांव ६

रा. रा. श्रीनिवासकृष्ण भातकुली. १०

रा. रा. माधवराव देशपांडे. फतेखेर्डा. ५

रा. रा. वामन जीवनराव. मास्तर. १८८९६

---

## वऱ्हाड.

मि. क्विन्टीन बायरन यांना वऱ्हाडांत अ. पो. सुपरिटेन्डेंट नेमले. व त्यांनीं आपले कामाचा चार्ज गेले आठवड्यांत येथें घेतला. सदर्हू गृहस्थास आजमीर कडून इकडे आणले असें आम्ही ऐकतों. इकडे कोणी ह्या जागेस लायक नव्हते काय?

डि. फारेस्टचें सर्व काम नवीन नियमा प्रमाणें डे. क. यांजकडे दिल्यामुळें त्यांस मदत करण्याकारितां फारेस्ट डिपार्टमेंट कडून एक आफिसर येथें पाठविला आहे. त्याचे बरोबर एक क्लार्क असून ते आपली कचेरी डे. कॅ. चे जवळच करित असतात असें ऐकतो.

येथें असलेले ए. अ. कमिशनर मि. बेविन यांनां तिसरा वर्ग माजिस्ट्रेटचा व पांचशें रुपयेपर्यंत दिवाणी काम चालविण्याचा अधिकार दिला.

जी. जे. व्ह्यान सोमरेन फारेस्ट कानसरव्हेटर व ई. जे. गन्थार्प डि. सु. पोलीस हे आजपावेतों मेजर होते ते ता.० सप्तेंबर पासून ले० कर्नल झाले.

मि. आबदुलबारी तहशिलदार यांनीं पेन्शन घेतल्यामुळें त्यांचे कायमचे जागेवर मि. शापूरजी वीरजी आ. तहशीलदार यांनांच कायम करावे अशी शिफारस मे. कमिशनर साहेब यांनी केली आहे असें आम्ही एकतो. हें खरें असेल तर मि. शापूरजी यांचे पेक्षां मि. रोहणखेडकर यांचे हक्क जास्ती असून त्यांचे नांव ह्या वेळेस मागें कां टाकले ते कळत नाहीं. मि. रोहणखेडकर हे वऱ्हाडांतील पहिले (वऱ्हाडी) ग्र्याजुएट असून हायर स्टांडर्डचे पारिक्षेंत हि पहिले आले आहेत. यांनीं आक्टिंग तहशिलदारीचें कामही पुष्कळ वेळ केलें आहे. त्यांनीं आपले काम चांगलें केलें असा रिपोर्टही आहे. या प्रमाणें सर्व गोष्टी मि. रोहणखेडकर यानां अनूकूल असूनही त्यानां नेहमी आक्टिंगच ठेवावे असे जर वरिष्टांचे मनांत असेल तर हे गृहस्थ कमनशिबाचे आहेत असें म्हणणें भाग पडते. मि. शापूरजी हे फक्त लोअर स्टांडर्ड पास झालेले असून त्यांनां एकदम ७५ रुपयाचे नाझरचे जागे वरून तहशलिदार नेमणें म्हणजे दुसऱ्याचे हक्काकडे दुर्लक्ष करणें होय. या करितां आम्ही मे. रेसिडेंट साहेबांस इतकेच सुचवितों कीं त्यांनीं ही कायमची नेमणूक करितांना वरील सर्व गोष्टींचा पूर्ण पणें विचार करून मग काय करणें तें करावें.

मि. शापूरजी यानां कायमचे तहशीलदार नेमल्यास त्यांचे एथील नाझरचे जागेवर हल्लीं आ. काम करीत असलेले मि. विठूजी नारायण यानांच कायम करण्याचे मे. डे. क. साहेब यांचे मनांत आहे असें कळतें. सदर्हू गृहस्थ हुशार नाहींत व त्या जागेचे लायक नाहींत असें आमचे मुळींच म्हणणे नाहीं परंतु त्यांचे पेक्षाही ज्यास्त हक्कदार लोक पुष्कळ आहेत व कित्येक तर आज पुष्कळ वर्षे पावेतों कायमचे नाजरचें काम उत्तम रितीनें बजावीत आहेत. असें असून यां सर्वांचे हक्क येकीकडे ठेवून केवळ वरील गृहस्थ बरेच दिवस आक्टिंग कामकरीत आहेत म्हणुनच त्यांस कायम करावयाचे म्हणजे नुसतां अन्याय करणें आहे. सदर्हू जागे करितां खरोखर एखादा इंग्रजी व मराठी चांगले जाणणारा पाहिजे आहे. या करितां ही कायमची नेमणूक करते वेळीं मे. जु. क. साहेब दुसऱ्याचे हक्काचा योग्य विचार करतील असे आम्ही इच्छितों.

गेले शनिवारीं एथलि ने. ज. लायब्ररींत मि. चिंतामण गणेश असिस्टंट मास्तर हायस्कूल यांनीं "विद्वान (educated) लोकाचे हिंदुस्थानचे हल्लींचे स्थितींत कर्तव्यकर्म" या विषयावर इंग्रजींत निबंध वांचून दाखविला. निबंधांत लिहिलेल्या कित्येक गोष्टी व रे. फुलर साहेबांनीं आपले भाषणांत दर्शविलेल्या बहुतेक गोष्टी विचार करण्या सारख्या आहेत, यांत संशय नाहीं. निबंध वाचून दाखविणें झाल्यावर त्यांचे आभार मानणारे गृहस्थानीं एज्युकेटेड लोक मुळींच कांहीं करीत नाहींत तर पोटार्थी असून फक्त ऐट व डौल मारित रस्तोरस्तीं फिरतात. यांनींच पुढारी होऊन सर्व कामें करावित व आम्हास निकडून सुख होईल असेंच नेहमी करीत रहावें व ते तसें करीत नाहींत तों पावेतों ते केवळ आज्ञानांचे बरोबरीचें आहेत असें समजले पाहिजे वगैरे शद्बांनीं बोलून दाखविलें. जे बोलतो ते कित्येकांस लागेल ते त्यांनीं मुळींच मनांत आणू नये कारण 'माझा तसा बोलण्याचा हेतू नाहीं.' असें कौमुदी सूत्र पहिल्यानेंच ठोकून दिले व नंतर हवे तसे विद्वान लोकांवर वाक्शस्त्र चालवून मोठ्यानें गर्जना केली. आखेरीस आमचे विद्वान मित्र रा. रा. विष्णु पंत महाजनी यांनीं जेव्हां आपलें विद्वत्रूपी मात्रेचा उपयोग केला तेव्हां सर्व स्वस्थ झालें. त्यांनीं आपलें बोलण्यांत असें दर्शविलें कीं, आतां पावेतों जीं जीं भाषणें एज्युकेटेड लोकांचें संबंधानें झाली त्यांत एकानेंही एज्युकेटेड लोक म्हणजे कोणास म्हणावें या बद्दल मुळींच उल्लेख केला नाहीं व त्यामुळेंच असा गैर समजाचा प्रकार झाला असें मला वाटतें. आतां एज्युकेटेड कोणाला म्हणावे हे मला ही सांगतां येत नाहीं कारण मेसर्स, रानडे, तैलंग, क्रिस्तोदासपाल, दादाभाई नौरोजी व मंडलीक ह्या सारख्या गृहस्थांनाच जर ऐज्युकेटेड म्हटले तर ते आपली योग्य कर्तव्य कर्मे करीत असून हिंदुस्थानच्या प्रजेच्या कल्याणासाठीं झटतच आहेत असेंच म्हटले पाहिजे. त्यांच्या शिवाय जे आपण सर्व आहोंत ते सर्व सारखेच असून सर्वांनीं मिळून काम करीत गेलें पाहिजे. फरक इतकाच कीं आपल्यापैकीं कांहीं जण कमी शिकलेले आहेत व कांहींजण ज्यास्त शिकलेले आहेत. वर लिहिले गृहस्थां प्रमाणेंच ज्या वेळेस हिंदुस्थानांत पुष्कळसें होतील त्या वेळेस तुमचें जें म्हणणें आहे कीं एज्युकेटेड लोकांनींच सर्व करावें, तें खरें होईल व तसें जों पावेतों झाले नाहीं तों पावेतों एकमेकांनीं एकमेकाला मदत करून सर्व मोठमोठीं कामें शेवटास नेली पाहिजेत.' एज्युकेटेड लोक कुच कामाचे नाहींत वगैरे म्हणणारे जे कित्येक गृहस्थ आहेत त्यांनीं मात्र आपल्यास अविद्वान (un educated) म्हणवून घेऊन सर्व दिवस रात्रभर, नाच, गाणे, बैठका वगैरे ऐषआराम करण्यांत व नुसत्या पोकळ गप्पा, व दुसऱ्याच्या कुचेष्टा करण्यांत वेळ घालवावा व सर्व कामें एज्युकेटेड लोकांनींच करावीत असें म्हणणें केवळ आश्चर्य आहे असें आम्हास वाटते. ज्यांनीं त्यांनीं आपल्या योग्यतेप्रमाणें कामें उचललीं पाहिजेत व त्यांतच सर्वांचे इष्ट आहे. अमुक एक विषयावर व्याख्यान देणें म्हणजे केवळ आपले विचार दुसऱ्यास सांगणें इतकेंच आहे. व ते सांगतांना दुसऱ्यांस वाईटन वाटेल असें बोलणें म्हणजे झाले. एकंदरींत सर्वत्रांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं हीनी व्याख्यान मालिका आज पावेतों सुरळींत रीतीनें चालली आहे ती कांहीं एक व्यत्यय न आणितां तशींच चालवावी असें सांगून हा आम्ही आपला लेख पुरा करितों.

---

## वर्तमानसार.

काशीस एक बारी असा दृढ निश्चय करून बसला. आहे कीं, एक लाख रुपये मिळाल्या शिवाय श्री विश्वेश्वराचें दर्शन घ्यावयाचें नाहीं. तेथें देवालया नजिक विडे विकण्याचें दुकान घालून त्या जवळ आज पन्नास हजाराची माया झाली आहे. कोण भक्ति ही !

ज्ञा० प्र०

म्हापसे ज्ञानप्रकाशचा बातमीदार कळवितों कीं–येथील बाजारांत एक अशी बातमी पसरली आहे कीं, सांवतवाडी संस्थानांतील एका ब्राम्हणमित्राच्या घरीं एक मुसलमान गेला आणि त्यानें त्याच्या तरुण बायकोला भ्रतार कोठे आहे म्हणून विचारलें. ती म्हणाली बाहेर गांवीं गेले आहेत, उद्यां येतील त्यावर मुसलमान म्हणाला, आतां तर रात्र झाली, आजच्या घडी खाना खाण्यास येथेंच रहतो. ती स्त्री बिचारी सज्जन होती. तिनें त्यास पात्र वाढिलें, व पुन्हां आणली कांहीं वाटीत होती, इतक्यांत त्या कामोन्मत्त अल्लाभक्तानें त्या बाईला बळकट धरिलें पुढें कांहीं केल्यानें हा दुष्ट सोडणार नाहीं अशी जेव्हां त्या बाईची खातरी झाली, तेव्हां तिनें त्याच्या उद्देशाला मान्य झाल्याचें चिन्ह दर्शविलें, पण त्याच्या मनाला ती खातरी न पटून तो तिला सोडीना. म्हणून अगदींच वश झाल्याबद्दल (बाटण्यासारखी) मधूर भाषणें बोलून ती चतुरबाई एकदम हात सुटतांच घरांत गेली, व तिनें दाराला गच्च आढें ठोकलें परंतु त्या गडबडींत मूल बाहेर राहिलें होतें, ते तिच्या लक्षांत नवतें. बाईनें आढें ठोकलें असें पाहून त्या दुष्ट मुसलमानानें दार फोडून तुझा प्राण घेईन इत्यादि प्रकारें बाईला पुष्कळ धमकी दिली, परंतु बाई तर कांहीं केल्या दार उघडीना. हें पाहून त्या दुष्ट राक्षसानें बाहेर असलेल्या मुलास आतां ठार करितों असें म्हणून चिमटे घेऊन घेऊन त्या मुलाला पुष्कळ रडाविलें, कीं, मुलाच्या कळवळ्यानें तरी ती दार उघडील. पण इतके करूनही जेव्हां बाई दाद देईना, तेव्हां त्या पाषणहृदई खाटिकानें त्या मुलाचे हाल हाल करून प्राण घेतला, आणि तेथें जवळच भिंतीला एक खिडकी होती; तिचा लांकडी गज फोडून आंत मान घालून बाईला टेहळूं लागला. तेव्हां ती गरीब साध्वी घाबरली, आणि तिनें त्या धांदलींत हातास मिळालेल्या कोयत्यानेंच त्या दुष्टाचें शीर तोडून त्याला आपल्या मुलाच्या समाचारास पाठाविलें. पुढें चौकशी होऊन सेशनांत ती निरापराधी बाई सुटल्याचें कळतें. या ब्राम्हणाचें घर एकांतास असल्यामुळें असें झालें असें म्हणतात. एकंदरींत या साध्वीचें धैर्य तारीफ करण्यासारखें खरें ! ! ज्ञा० प्र०

म्हैसूर इलाख्यांत तालुके चंद्रापटण एथें एका पाहडावर, श्री बाहुबली ' ऊर्फ कुमठेश्वर स्वामीची शिळेची प्रतिमा आहे. ही प्रतिमा अठरा पुरूष उंच असून बारा कोसांवरून दिसते. ही प्रतिमा भूमिगत असलेली म्हैसुरचे महाराज चामुंडराय यांच्या मातोश्रीला दृष्टांत झाल्यावरून त्यांणीं आपल्या विरीजवाकडून या प्रतिमेची पाहडावर शालीवाहन शके ६०० बहुधान्य नामसंवत्सरीं प्रतिष्ठापना कराविली असा लेख मिळतो. या देवाची पूजा करणें झाल्यास निदान १५।२० हजार रु० लागतात, आणि आजपर्यंत ३।४ वेळांच कायती अशी पुजा बांधली आहे, म्हणतात.

विजेच्या दिव्याची बंदुक– अंधारांत शिकार करता यावी म्हणून पाहिजे त्यावेळीं विजेचा दिवा उपयोगीं पडावा अशी बंदुकीतच योजना करून ठेविलेली बंदुक अमेरिकेंत तयार झाली आहे. कल्पनांचा अमेरिकेंत ऊत आला आहे ! ज०

मलेरिआ ज्वरावर साधा उपाय.–सर्द, दमट, सखल आणि सर्व बाजूंनीं झाड झुडपांनीं वेष्टित अशा ठिकाणीं राहिल्यानें एक प्रकारचा ताप येतो. त्यास "मलेरिआ" ज्वर असें म्हणतात. हा ताप एकदां लागला म्हणजे जातां जात नाहीं. या ज्वरावर "कुइनाइन" देतात. परंतु केव्हां केव्हां तें मुळींच लागूं पडत नाहीं. म्हणून अलीकडे रोम येथील डाक्टर क्रूडेल नांवाच्या एका वैद्यानें एक अगदीं साधा उपाय सांगितला आहे. तो असा. सालीसह लिंबू घेऊन त्याच्या पातळ चकत्या कापाव्या आणि त्या सुमारें दीड शेर पाण्यांत घालून भांडे चुलीवर ठेवावे, आणि त्यांत अर्धा शेर पाणी राहीपर्यंत तें कढवावें. नंतर हें अर्धा शेर पाणी त्या लिंबाच्या तुकड्यांसह एका फडक्यांतून गाळून काढावें, आणि तें गाळलेलें पाणी निवाल्यावर सकाळीं जेवणाचे अगोदर पिऊन जावें.

सूर्यकिरणांची उष्णता.—सूर्याची किरणें वातावरणांतून पृथ्वीवर येत असल्या कारणानें त्यांची बरीच उष्णता कमी होत. यामुळें त्यांच्या ठायीं वास्तविकपणें किती उष्णता आहे याची खरी कल्पना आपणास करितां येत नाहीं. तथापि इंग्लंदांतील एका प्रसिद्ध पदार्थ विज्ञानवेत्यानें थोडे दिवसांपूर्वीं "सूर्यप्रकाश" या विषयावर व्याख्यान दिलें. त्यांत त्यानें म्हटलें आहे कीं, आपल्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर चहूकडून सुमारें १८० फूट उंचीचा बर्फाचा थर आहे अशी कल्पना केली तर हा एवढा थर दरसाल वितळण्या पुरती उष्णता सूर्यगोलांत आहे !

पारिस येथें प्रेतदहन.– फ्रान्समध्यें प्रेतदहनाचे प्रयोग करून पाहिले, ते सर्व पसंत पडल्यावरून रोम आणि मिलन या ठिकाणीं ज्या प्रकारच्या भट्या प्रेताचे दहन करण्याकारितां तयार केल्या आहेत त्याच्याच धर्तीवर पारीस येथेंही एक भट्टी तयर करण्याचें काम हल्लीं चालू आहे. तिजमध्यें प्रेत जाळण्यास दर प्रेता मागें सुमार ६ रु० खर्च येईल असा आजमास आहे. अशाच भट्या आमच्या देशांत तयार करविल्यास याहूनही कमी खर्च लागणार नाहीं काय ? सु० ज्ञा०

हिंदुस्थानामध्यें, हजार मुलग्यांतले १८४ मुलगे आणि हजार मुलींतल्या ८ मुली शाळांत जातात. बाकीची मंडळी काय करतें ! निरक्षर रहाते ! ह्याचा विचार सरकार करील तर बरें होईल. बा०

वळसंगचा एक बातमीदार लिहितों कीं, तेथील एक कुंभार आपलें मडकीं घडण्याचें काम करीत असतां त्यानें एकाएकीं डोळे पांढरें केले व तो वारला, असें समजून घरच्या मनुष्यांनीं आकांत केला, इतक्यांत तो जिवंत होऊन आपलें काम करूं लागला.

तो बातमीदार असें लिहितो कीं, एका कोंबडीस तीन चोंचीचें एक पिलू झालें. तें अंड्या बाहेर पडल्याबरोबर लागलीच मेलें. वळसंगकडे पावसानें आबादानी केल्याचेंही म्हणतो.

काश्मीर संवस्थानांत इंग्रजांनीं आपला रेसिडेंट नेमला. पूर्वीचे महाराज वारल्या बरोबरच हा चंचुप्रवेश ! पु० वै०

फ्लारेन्स येथील रायल इन्स्टिटयूटचे संस्कृत प्रोफेसर कौंट एनजेलो डी गुबरनाटिस व कौंट ए. अलबियानो व कौंट जी. डीनोबिलि हे दोघे सरदार इटली सरकाराकडून त्या देशाचा हिंदुस्थानाशीं व्यापार झाला असतां फायदेशीर होईल किंवा नाहीं हें पहाण्यास मुंबईस आले आहेत.

कलकत्यास श्रीगिरिधर महाराज गोसावी यांनीं पुरुषोत्तम गोसांवी यांच्या ताब्यांतून आपल्या आज्याची तसबीर घेण्याकारितां फिर्याद केली, त्या खटल्यांत आजपर्यंत उभय पक्षांस सुमारें दोन लक्ष रुपये खर्च आला, व या पेक्षांही अधिक होण्याचा संभव आहे, कारण या विषयीं विलायतेंतील प्रिव्ही कौंन्सिलमध्यें अपील होणार आहे. मूळ तसबिरीची किंमत सहा रुपये आहे असें म्हणतात. गोष्ट हट्टास पडली म्हणजे विचार एकीकडे राहून असा मूर्खपणा होतो.

एतद्देशीय स्त्रिया करितां स्वतंत्र दवाखाना करण्यास्तव मद्रास येथें तारीख २३ माहे सप्तेंबर पर्यंत एक लक्ष रुपये वर्गणी जमा झाली.

इंग्लंडांतील लोकांनीं बेडूक व गोगलगाई खाण्यास आरंभ केला असें म्हणतात.

इजिप्तच्या प्रख्यांत मनोऱ्याचा पाया शोधण्याचा विचार आहे.

बंगाल इलाख्यांत एकंदर ४,०००चौरस मैल जमिनीवर जलप्रलयामुळें पिकांची नासाडी झाली.

मद्रास इलाख्यांतील कांहीं कलेक्टरांनीं विचारल्यावरून मद्रास सरकारानें जी स्त्री म्युनिंसिपालिटीचे कर देते तिला सभासदांच्या निवडणुकी करते वेळी आपले मत देण्याचा हक्क आहे म्हणून सांगितलें.

काश्मीरचे हल्लींचे महाराज प्रतापसिंग हे त्या देशचे राज्यसुत्र चालविण्यास नालायक ठरत असल्यामुळें त्या देशच्या राज्यव्यवस्थेंत हात घालणें इंग्रज सरकारास जरूर पडेल अशी वदंता आहे. सु० प०

ब्रह्मदेश व फ्रान्स यांचा मुदलींच तह झाला नाहीं अशी पारीस येथून तार आली आहे.

. महाराज धुलीपसिंग यांचा हिंदुस्थानांत येण्यास निघण्याचा विचार डिसेंबरच्या १९ व्या तारखेपर्यंत तहकूब झाला.

हिंदुस्थानांत पांदेचरी म्हणून जे एक फ्रेंचाचें संस्थान आहे त्यांतील मिठाच्या हक्काबद्दल हिंदुस्थान सरकारानें त्या फ्रेंचसरकारास दरसाल ४,००,००० रुपये देण्याचे ठरले आहे असें सांगतात.

विलायतच्या लंडन शहरापासून मुंबईपर्यंत रेलवेचा रस्ता करावयाचा विचार चालू आहे. हा रस्ता तयार झाला म्हणजे मुंबई व लंडन यांच्या दरम्यान नऊ दिवसांचा रस्ता होईल. हा रस्ता पारिस, माद्रीद, जिब्राल्टर, तांजार, केटा, अलजीर, टुनीस, त्रिपोली, केरो, बसोरा केलात, कराची व मुंबई असा होणार आहे. या कामास जी कंपनी पुढें झाली आहे तिचें भांडवल ६९, ००,००,००० रुपये करण्याचें योजिलें आहे. ही कपनी एक वर्षा पूर्वीच विलायतेस स्थापन झाली असून लंडन पासून मुंबई पर्यंतचा रस्ता ७,००० मैल होणार आहे. पण मध्यंतरी फ्रान्स व स्पेन यांचे जे रस्ते तयार झाले आहेत ते वजा केले म्हणजे या कंपनीस ५५१३ मैल नवा रस्ता तयार करावा लागणार आहे व त्या पैकीं ६८८ मैल रस्ता तयारही झाला आहे.

मुंबईच्या एका पलटणींत चाकरी करून विलायतेत गेलेल्या साहेबानें ८,००,००० रुपयांचें स्वसंपादित मिळकतीचें मृत्युपत्र केलें.

मुंबईचे सर फ्रांक सुटर हे लवकरच विलायतेस जाणार असल्यामुळें मुंबई म्युनिसिपालिटींत त्यांची जागा जी रिकामी होईल त्या कारितां मि. मंडलीक यांणी क्यांडीडेट म्हणून पुढें यावें अशा लोकांच्या सूचना होऊं लागल्या आहेत. टा० अ०

भयंकर वावटळ– बंगाल प्रांतामध्यें पूर व वावटळी यांनीं अगदीं कहर करून सोडिला आहे शेकडों लेंडीं धुवून व उडून गेली आहेत. कोणी दाम्यांचे डोळे या विपत्तग्रस्तांकडे लागतील काय?

विद्युच्चंद्र— विलायतेच्या एका पत्रावरून असें कळतें कीं, न्युयार्क मध्यें इलियन येथें विद्युद्दीपांच्या कारखान्यांत एक विद्युद्दीप तयार करण्यांत आला आहे. त्याचे तेज ५०,००० मेणबत्याहून ही सरस आहे हा एका उंच टावरवर लावून सिनको शहर भर याचाच उजेड करण्याचा बेत दिसतो. या योजनेनें सिनको शहरांतील लोकांस अमावास्येचे अस्तच होणार म्हणावयाचें!

इंग्लिश बारिस्टरची अवश्यकता—डेक्कन हेरल्ड वरून असें कळतें कीं, सरस्टयुवर्ट बेली आणि रेसिडेंट साहेब यांनीं डेक्कन हायकार्टमध्यें मुख्य न्यायाधिशाचे जागीं चांगला अनुभवशीर असा इंग्लिश ब्यारिस्टरच नेमिला पाहिजे असें निजाम सरकारच्या मनांत भरवून दिलें.

हिंदु विद्यार्थी— कुचबिहारचा कुमार भवेंद्र नारायण नांवाचा एक विद्यार्थी एडिंबरो येथलि स्कूल आफ मेडिसिन मधील फर्मसि एक्झामिनेशनमध्यें केवळ पसार झाला इतकेंच नाहीं. परंतु तेथलि सर्व विद्यार्थ्यांमध्यें याचा पहिला नंबर आला. व त्यास त्याबद्दलचें सन्मानदर्शक पदकही मिळालें आहे. इं० प्र०

देणगी-- श्री०; गायकवाड सरकार सयाजीराव महाराज यांणीं पूर्णे येथील सभा वगैरेना २२,००० रु० दिल्याचें समजतें. न्या० सु०

अपघात—कराचीस एका पीठ दळणाऱ्या चक्कीस जोडलेला उंट स्वस्थ उभा असतां एक ५।६ वर्षांचें अचपळ मूल त्या चक्कीजवळ, जाऊन त्याणें हातांत असलेल्या काठीनें त्या उंटास मारलें त्याबरोबर उंट फिरूं लागून चक्कीखालीं तें मूल सांपडून त्याचा चेंदामेंदा झाला! व.

---

☞ हें पत्र आकोला येथें के.वा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

(स)हामाही ,, ३ ,, ,, ८८
साल अखेर ,, ७ ,, ,, १८८
किरकोळ अंकास.... ....................८४

Per annum in arrears 7 ,, 1 R 8as
Six monthly............ 3 ,, 8 as
single copy................................4 as

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ८।८६
दुसरे खेपेस ........८१

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XIX | AKOLA MONDAY OCTOBER 19 1885 | NO 41

पुस्तक १९ | अकोला सोमवार तारीख १९ माहे आक्टोबर सन १८८५ इ० | अंक ४१



PHOTOGRAPHS! PHOTO GRAPHS!!

*IMPORTED direct from the Continent. Artistic Studies from Life, Classical and Mythological undraped Figures, Statuary, Sacred and Secular Photographs, Portraits of Celebrities, Pretty Women, English and French Actresses. Selections sent out on approval on receipt of deposit of 10 s. and upwards. Price Lists and complete Catalogues post free. Address, Continental Novelty Co., 50 Leicester square London, England. The trade spplied.*

## पक्षकार लोकांस फार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए एल. एल. बी. मुंबई हायकोडताचे वकील हे सर्व्हा वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचें हाशीस "वऱ्हाडसमाचार" छापखान्याशेजारीं काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८४ इ० } पत्रकर्ते.


### नोटीसीचें उत्तर.

रा. रामचंद्र येशवंत आफू गांज्याचें मक्तेदार तालुके जळगांव व अकोट यांस खाली सही करणार याजकडून कळवीण्यांत येतें कीं, तुमची नोटीस वऱ्हाड समाचार पत्रातून तारीख २२।९।८५ ची तारीख ३ अकटोबर सन १८८५ इसवी रोजीं आम्हास पोचली त्याचा जबाब खाली लिहिल्या प्रमाणें.

१ मूळ तुम्ही जी नोटीस लिहिली त्यांत असवें नांव व्याहारिलाल हीरालाल आगरवाले असे असता तुम्ही व्याहारीलाल हीरामण यानावानें नोटीस दीलेली मिळाली तर हे काहीं आमचे नांव नाहीं. परंतु मक्त्याचे संमधाने आमचीच असावी हा अनुमा करून रजीष्टरावर सही करून देऊन घेणे भाग पडले. जर आम्हांसच तुम्ही नोटीस दील्ही असेल तर त्याचा जबाब खाली लिहिल्या प्रमाणें आमचा आहे.

२ कलम १ यांत लिहिलेंकीं, तुम्ही आम्हांस पत्र लिहिलें त्यावरून तुमचे मत फीर्याद करण्याचे दीसते तर हे तुमचे अनुमान व्यर्थ आहे कारण आज ६ महीने झाले तुमचे आमचे भागणि मक्त्या संबंधी सर्व काम एकमेकाच्या वीच्याराने करण्याचे या बद्दल तुम्ही आम्हास तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १८८५ इसवी रोजीं एक रुपयाच्या ष्टांपावर करारनामा लिहून दीला या प्रमाणे एकही वर्तन तुमचे कडून न होता तुमचे स्वताचे मत मक्त्याचे काम चालवीत आहा ही तुमची मोठी इमानाची व खरे पणाचे सचोटीची रीहा उघड नजरेस आली, आणि व्यापार संबंधांत शेकडो ठिकाणीं फक्त जबान गेली म्हणजे ते व्यापारी ती सांभाळण्या करीतां किती स्वतः झटतात इतकेच नाहीं तरी लाखो रुपयाची नुकसानी सोसतात तत्रापि खरे प्रमाणिक वचनात बीलकुल टळत नाहीं आणि तुमचा तर लेखी कागज आहे तत्रापि तुमचे बुधीत हीं कुबुद्धींचा फरक नजरेस आला तर आतां इतकेच कळवीतो कीं असे व्यापारी यास करणें अगदीं उचीत नाही कारण सचोटी व प्रामाणीकपणां हे ही एक अबरूदार मनुशास भुषणास्पद आहे त्याजवर तुमची बिलकुल निगा नाहीं असे तुमचे हलीचे वर्तना वरून स्पष्ट दिसून आले.

३ नोटीसींतील कलम २।३ चा जबाब आमचा बंधू रामुलाल व तुमचा मुलगा तुळशीराम या उभयतास अनुक्रमे अकोट व जळगांव या ठिकाणचे मक्ते अपण दीले परंतु त्याजकडून पेशगी घेणें व त्याजबद्दल हर एक प्रकारची जबाबदारी सांभाळणें हे दोघांचे अनुमतें ठरून आपल्या वरच ही गोष्ठ अवलंबून असता तुम्ही फक्त आपले हीतकरून घेऊन विनाकारण पेसगी न दील्यामुळें दोघाकडील मक्ते कमी केले असें दाखवितां हें कारण किती खरें प्रकारचें अयोग्य आहे या बद्दलचा कपटी व खोटा विचार सहज नजरेस येतो. तो असा कीं, आमचे बंधु रामुलाल यांचे ताब्यांत वहिवाट दिली नाहीं. आणि दोन मनुष्यें तुम्ही आमचें अनुमत न घेतां ठेविले. आमचें मात्र खरें नुकसान झालें आणि तुमचे मुलाचें मात्र नांव काढिलें आणि तें काम स्वतःच चालविलें तर तुमचे घरांतील घरातच नफा राहिला हें मोठे फायदेशीर काम केलें असें तुम्हस वाटते. परंतु तसें नाहीं. खरोखर विचार केला असतां कांहींतरी कारण दाखवून आम्हास दगा देऊन तुम्ही आपला मात्र फायदा करू इच्छिता. या बद्दल तुम्हास आमचे नुकसानी सुद्धां जबाबदारी द्यावी लागेल जर करितां हे दोन्ही पोंट मक्तेदार तरीाईत असते तर तुमचे हे वरील लिहिणें रास्त मानणें भाग पडले असते परंतु तसा कांहीं विचार मुळींच पूर्वीं आपण उभयतांनीं मनांत न आणतां घरांतील घरांत व्यवस्था केली होती ती आम्हास मात्र कांहीं हितावह न होता तुमचे फायद्यावर पडली करितां हे तुमचे लिहिणें अगदीं गैर आहे.

४ कलम च्यार बद्दल जबाब ह्या कलमांतील बहुतेक मजकूर विनाकारण व अगदीं खोटा लिहिला आहे तो असा कीं, आकोली जहागीरिचे पेशगी बदल आम्ही आपले हिश्शाची तुम्हास पूर्वीचे आमचे जळगांव तालुक्यांतील मक्त्याची आफू शिलक राहिलेली दिली ती तुम्ही मोजून घेऊन त्याज बद्दल तुम्हा पासून आम्ही कांहीं कीमत घेतली नाहीं. व तुम्ही आम्ही आपसात समजून त्या पेशगीचा निकाल पूर्वींच केला. करितां हे कारण पेशगी बद्दल किती खरें दाखवितां याचे अनुमान तुमचे तुम्हीच करा, परंतु कांहीं तरी कारण दाखवावें, जें कारण दाखविणें हें कांहीं तरी खरें असले पाहिजे सबब ते तुमचे म्हणणें आम्हास बिलकुल कबूल नाहीं.

खामगांव येथील आफू कलाली बद्दलचो मजकूर लिहिला तो अगदीं व्यर्थ गैर समजुतीनें लिहिला आहे. तुम्हस ८०००रुपये आठ हजार रुपयाची जी रकम लागली आहे ती कशास कां लागली हे समजत नाहीं. जर आफू खरेदी करितां लागली असेल तर ही तुमची चूक आहे. कारण इतकी रकम लागण्याचे प्रयोजन दिसत नाहीं ते असें कीं, आम्ही तुम्हास मक्याचे सुरवाती करितां रोख रुपये ५०० सुमारें दिले आणि तितकेंच रुपये तुमचे असलेच पाहिजेत. व शिवाय दुसरे पोट मक्तेदार याजकडून पेशगी बद्दल मक्त्याचे रकमेचे मानानें सुमारें ८००० आठ हजार रुपये आले असतील मिळोन एकंदर भांडवल सुमार९००० नऊ हजार रुपयाचे झाले. तितके रकमेंत सहाजिक खर्चांपुरती दोन्ही तालुक्या करितां ठेवून शिवाय पोट मक्तेदार याजकडील आफूच्या ठोक विक्रींतील नफ्याची रकम खर्च वगैरे जाऊन बचत रहाती. तीही आफू आणण्याचे कामीं उपयोगी पडण्याची आहे असें असतां आठ हजार रु० देणें आहेत किंवा तुमचे जवळचे खर्च झाले आहेत ते व्याज सुद्धां द्यावें असे दाखवितां हें अगदीं गैर आहे विनाकारण कांहीं तरीथोतांड माजवावे हा तुमचा हेतु दिसतो हे अब्रुदार यांचें कर्तव्य कर्म नाहीं इतके ही समजून तुम्ही न वर्ताल तर याबद्दल तुम्हास योग्य जबाब देण्यास मोठी मुश्कील पडेल हे तुमचे कर्तव्यावरून उघड दिसतें.

५ कलम ५ बद्दल जबाब आम्ही पूर्वीं तुम्हास जी नोटीस ता. ३० सप्तंबर १८८५ रोजीं वऱ्हाडसमाचार छापखान्यांतून दिली आहे त्या नोटिशींतील ४।५।६ कलम प्रमाणें खरोखर समजावें. व त्यावरून खात्री होईल सबब तुमचें म्हणणें कलम ५ प्रमाणें अगदीं गैर समजुतीचे आहे मात्र उलट आम्हास जे पुढें तुमचे कडून काय मागणें करावें ते आम्हास पूर्वींच सुचविलें ही एक आमचे तूर्त फायद्याची गोष्ट आहे.

सदर्हु प्रमाणें तुमचे नोटीसीचे जबाब दिले आहेत त्याजवरून खरी चूक तुमची किंवा आमची याचा विचार उदीमदार सहज करतील. यास्तव तुम्हास वाटेल तर अशा भारी विनाकारण खर्चाचे भानगडींत न पडतां आम्ही तुम्हास पूर्वीं दिले नोटिशीप्रमाणें करावें या उपर तुमची मर्जी. तुमचे चुकीमुळें ह्या नोटिसीचा जबाब आम्हास देणें भाग झाले याचा छापण्याचा वगैर खर्च तुम्हास द्यावा लागेल कळावें.

ता. १७ माहे आक्टोबर सन १८८५इ०

(सही) व्याहारीलाल हिरालाल

दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मूर्तिजापूर ता. १३।१०।८५इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. पुढील मजकुरास येत्या अंकीं जागा मिळेल अशी आशा आहे.

**पर्जन्य**— या आठवड्यांत एक दोन दिवस विजांचा चकचकाट आणि मेघांचा गडगडाट होऊन पर्जन्यानें दुनिया आबाद केली आहे. इतःपर पर्जन्याची अपेक्षा राहिली नाहीं. अधिक वृष्टि नुकसानास कारण होईल असा सर्वांचा समज आहे.

**येऊन गेले**— हिंदुस्थानीं डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेब तारीख १० रोजीं येथें दाखल झाले आणि सकाळ पासून परीक्षेस आरंभ केला. ती ता. १५ रोजीं आटोपून साहेब कारंजाकडे निघोन गेले. या गांवांत मुसलमान लोकांची वस्ती सुमारें २०० घरांपर्यंत असून शाळेंत जेमतेम ३० ३५ मूलें राहण्याचीं देखील पंचाईत आहे. स्कूल कमेटीनें मुलें जमाविण्याच्या बाबदींत श्रम केले असते व त्यांच्या श्रमास यश ही आलें असतें, परंतु कमेटींत एक मुसलमान मेंबर असावा असा बूट निघाला असून येथील तहशिलदार यांणीं (आपल्याच अखत्यारीनें किंवा डि० कमिशनर यांचे हुकुमावरून हें ईश्वरासच ठाऊक) एका मुसलमान इसमाची नेमणूक केली आहे तो काय करितो हें पाहून मग हिंदु कमेटी उद्योग करणार असा अदमास दिसतो.

**जागा खाली झाल्या**—के. वा. तात्या साहेब भडंग यांच्या मरणानें येथील स्कूल कमेटींत प्रेसिडेंटाची आणि डिस्पेन्सरी कमेटी व लोकलकमेटींत एकेक मेंबराची अशा तीन जागा रिकाम्या पडल्या आहेत. त्यावर कोणाच्या नेमणूकी होतात हें पाहवें. लोकलकमेटींत आणि डिस्पेन्सरी कमेटींत एखादा वकीलाची नेमणूक होईल तर फार चांगलें होईल. आणि स्कूलकमेटींत असलेले मेंबरांपैकींच कोणाची तरी प्रेसिडेंटाचे जागीं नेमणूक करून मानी प्रेसिडेंटाचे कनिष्टबंधु रा. विठ्ठलराव

यांस मेंबर नेमावें असा बहुतेकांचा अभिप्राय दिसतो.

**बिलक्षण चूक**---रालीब्रदरच्या उमरावतीच्या एजंटानें येथील एजंटास तारेनें अळशीचा भाव 'थर्टि वनफोर्थ' अशा शद्बांनीं कळविला. त्यावेळीं येथील स्टेशनावर सिग्नलर कोणीच नसून रातपाळीचे मास्तर मिस्तर अन्ताजी पंत होते, त्यांणीं 'थर्टिवन फोर्थ' (म्हणजे ३१¼) असा भाव लिहून ती तार येथील एजंटास दिली एजंटांनीं लागलीच ३१ च्या भावानें खरेदी करून कंपनीस चार आणे नफा दाखविला. तेव्हां उमरावतीच्या एजंटानें येथील एजंटास ३०¼ चा भाव असतां ३१ ची खरेदी केली ही चुकी असून सौदा रद्द करण्याविषयीं हुकूम पाठविला. सौदा रद्द करण्या पासून कंपनीच्या अब्रूस धक्का बसेल, त्या पेक्षां कंपनीनें स्वतः नुकसान सोसावें. किंवा रेलेव कंपनी पासून तें भरून घ्यावें अशा अर्थाचा येथील एजंटनीं रिपार्ट केला आणि त्या रिपोर्टा सोबत आलेल्या तारेचा कागद पाठविला. आतां राली ब्रदर्स ही कंपनी फार मोठी असून असल्या किरकोळ नुकसानीच्या बाबदींत रेलवे कंपनी पासून नुकसान भरून मागणार नाहीं असा संभव आहे. यद्यापि मागितलें तरी रेलवे कंपनी यांत पोक्त विचार करील असें अनुमान आहे. कांकीं तार देणारानें 'थर्टि एन्ड वन फोर्थ' अशी तार दिली असती तर चुकी होण्याचा संभवच नव्हता 'थर्टि वनफोर्थ' आणि 'थर्टिवन फोर्थ, या दोहोंत शद्बांचा कांहींच फरक नाहीं, सणू ही तार घेणारानी किंवा पाठविणाराची चुकी आहे असें म्हणतां येत नाहीं. पाहावें पुढें काय होतें तें.

**आनियमितपणाचा परिणाम**---आपल्या येथील कोर्टांतील कारकून व वकील यांस फार दिवसां पासून आनियमित पणाची म्हणजे १२ वाजेतों पावेतों देखील आपल्या कामावर हजर नराहण्याची संवई असून हल्लीं नवीन आलेले असिस्टन्ट कमिशनर फारच नियमित आहेत, त्या मुळें वकील कारकून व पक्षकार यांची फजिती व नुकसान होण्याचे प्रसंग अलीकडे वारंवार येऊं लागले आहेत. एके दिवशीं ए. आ. कमिशनर साहेब कचेरींत दहा वाजतां हजर झाले असतां दोन तीन शिपायां वाचून तेथें कोणीच हजर नव्हते. म्हणून कोर्टानें सुमार एकतास पर्यंत वाट पाहून त्या दिवशींचे सर्व मोकदमें काढून टाकिले; आणि घराकडे चालते झाले असो जें झालें तें फार उत्तम झालें. असे केल्याशिवाय आमची सुस्तावलेली मंडळी जागी होणार नाहीं.

**हरीची दासी**--येथें एक आली आहे. या कलियुगांत आणखी किती गोष्टी होणार याचें अद्याप अनुमान करितां येत नाहीं. आजपर्यंत हरिदास येत असत. आतां हारिदासी ही येऊं लागल्या आहेत. यांचें नांव गांव कीर्तन शैली वगैरे पुढील खेपेस कळवीन. आज पत्रविस्तार फार झाला म्हणून कचऱ्याची टो-

पली दाखवूं नये अशी प्रार्थना करून येथेंच थांबतों. लोभ असावा ही विनंती.

आपला.

"X.Y.Z"

वऱ्हाडसमाचार.

मिती आश्विन शुद्ध ११ सके १८०७

## मोहरम आणि दसरा

ह्या वर्षी असें झालें आहे कीं, हिंदु लोकांचा दसरा आणि मुसलमान लोकांचा मोहरम एकदमच आला आहे. इतर ठिकाणची गोष्ट राहूं द्यावी. मुख्यत्वें करून वऱ्हाडांतच पाहिलें असतां ही गोष्ट फार महत्वाची व विचारणीय आहे. कारण ह्या दोन्ही जातींचा समाज मोठा असल्यामुळें त्यांच्यामध्यें ह्या एक काली दोन्हीं सण घडून आल्यानें भयंकर तंटाबखेडा होण्याचा संभव आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांविषयीं एकंदर हकीकत पाहतां एकमेकांचा मनांत एकमेकांविषयीं भरलेले ग्रह काढून टाकणें व एकमेकाना एकमेकांच्या विरुद्ध होणाऱ्या गोष्टींविषयीं प्रतिबंध करणें हें फार सोपें काम आहे असें कदापि नाहीं. लोकांतील शांतता मोडूं नये या करितां जेथें जेथें तंटा उत्पन्न होण्याचा संभव आहे तेथें तेथें अगाऊ तजवीजा केल्या जात आहेत. फक्त उमरावती जिल्ह्यांतच हिंदुनी कोणच्या ठिकाणीं वाद्यें वाजवावी आणि कोणच्या ठिकाणीं तीं वाजवूं नयेत अशा विषयीं कुऱ्हा, मोर्शी, खोलापूर, मुर्तीजापूर, आणि दुसऱ्या ठिकाणचे तहशिलदारांस हुकूम सुटले आहेत. तथापि असें नियम बरोबर आहेत किंवा नाहींत अशाबद्दल आम्हास संशयच आहे. कारण अशा प्रकारच्या हुकूमाला अलिकडील चालूं असलेल्या कायद्या बरहुकूम पाहतां कोठें आधार सापडले असें मुळींच नाहीं. आपण उदाहरणार्थ घेऊं या, कीं मुसलमान लोकांच्या मशिदी जवळ अथवा निमाज पढण्याच्या ठिकाणा पासून दशपावले पर्यंत वाद्ये वाजवूं नयेत, असें जर म्हटलें तर वऱ्हाडांत चालूं असलेल्या कायद्यांत याबद्दल कोठें आधार सापडेल काय? जे कायदे बरहुकूम नाहींत ते हुकूम जर मोडले गेलें तर त्या बद्दल कायदा काय काय करील हे आम्हास समजत नाहीं. दुसरें असें पाहिले पाहिजे कीं, हिंदुलोकाना अमुकच नियमानें वागा असें फरमावण्या बदल जे हुकूम सुटतात, तसेच मुसलमान लोकांनी, हिंदुच्या देवालयांना त्याच प्रमाणें मान दिला पाहिजे असा हुकूम झाल्या शिवाय ह्या बाबतीत दिलेले हुकूम बारोबर आहेत असे आम्हास वाटत नाहीं. आणखी आम्हास असें वाटतें कीं मुसलमान लोकांच्या भलत्या सलत्या मागण्याला अनुसरणें बरें नाहीं. कारण हम रस्ते सार्वजनीक लोकांच्या उपयोगा करितां आहेत. असें असून अमूकच प्रकारच्या लोकांनीं (सार्वजनीक लोकांनीं) वाजवीत जाऊं नेय असें जे म्हणणें याचे कारण शोधून काढणें फार कठीण आहे. सन १८९४ सालांमध्यें बुलक साहेब बाहादुर (हल्लींच्या उमरावती जिल्ह्याच्या डेपुटी कमिशनराचें तिर्थरूप) यांनीं जें एक सर्क्यूलर काढलें होतें तें फार न्यायानें काढलें होतें असें आम्हास वाटतें. कारण हिंदु आणि मुसलमानांनीं अनादि कालापासून चालत आलेल्या वहिवाटी प्रमाणें आणि लोकांच्या संप्रदाया प्रमाणें आपापले सण करीत जावें. दोन्ही जातीच्या लोकांना सार्व जनिक रस्त्यावर वाजविण्यास परवानगी दिली होती आणि प्रत्येक इसमास आपल्या वहिवाटी प्रमाणें चालविण्यास मोकळीक असे, अलिकडे मुसलमान लोकांच्या मागण्या फारच अविचाराच्या होत चालल्या आहेत, आणि अधिकारी लोक त्यांच्या म्हणण्याला अनुसरतात. हेही कांहीं अंशी चमत्कारीक आहे. आतां खालीं आम्ही जी गोष्ट लिहितो त्या गोष्टी वरून अधिकारी लोक त्यांच्या म्हणण्या प्रमाणें चालतात या मुळें कशा प्रकारचा परिणाम घडतो तो सहज दिसून येईल. एक मनुष्य उमरावती येथें आपल्या घरीं हिंदु संप्रदाया प्रमाणें मूर्ती करित असे. त्याला मुसमान लोकांनीं अशी धमकी दिली कीं, जर मूर्ती करण्याचें काम तूं बंद केलें नाहींस तर, तें आम्ही मोडून टाकूं. हा गरीब बिचारा मनुष्य ह्या कामावर आपली उपजीविका च लवीत असे. परंतु अधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें त्या बिचाऱ्याला आपलें काम सोडून द्यावें लागलें! मुसलमान लोकांच्या मागणीची ही एक नवीन तऱ्हा आहे! आणि अधिकाऱ्यांनीं अशा म्हणण्याला कबूल व्हावे ना! आम्हास वाटतें ह्या गोष्टी पासून शांतता होणें तर एकाच बाजुला राहील उलट दोन्ही पक्षांमध्यें वैमनस्य मात्र विशेष वाढेल. सर्व प्रकारानें सर्व गोष्टी नीट चालून लोकांस शांतता राखण्याचा हा मार्ग नव्हे. मुंबई सारख्या मोठ्या शहरांत जेथें तंट्या बखेड्याची भिती वाळगावी लागते, तेथें सर्व रस्त्यांत पोलीसाचा खडा बंदोबस्त असतो आणि प्रसंगी उपयोगीं पडण्या करितां उत्तम प्रकारचे पटाईत शिपाई लोक ठेवून बंदोबस्त चांगला राखलेला असतो म्हणून अशा प्रकारचे हुकूम नदेतां सर्व गोष्टी तडीस जातात. आणि ह्या दोन्ही पक्षांमध्यें द्वेषीत भावाचा पक्ष कोणीच धरीत नाहीं.

यावरून आमचा असा अभिप्राय आहे कीं, सरकारच्या वऱ्हाडांतील अधिकाऱ्यांनीं कोणत्याही जातीच्या लोकांचा पक्ष न धरितां लोकांच्या धर्मा प्रमाणें उभयपक्षांतील लोकांनीं वागण्ण विषयीं सडकून ताकीद केली असतां दोन्ही जातीचे लोक सरकारी हुकूमा प्रमाणें वागणार नाहींत असें आम्हास वाटत नाहीं. कदाचित् कोणी सरकारी हुकूमाला न जुमानतां आपलेच घोडे पुढें ढकलले असतां सरकारास त्याचा बंदोबस्त करण्यास उशीर मुळींच लागणार नाहीं.

---

कालरोजी प्रातःकाळीं येथील म्युनिसिपल सिटी स्कुलांत तेथें स्थापन झालेल्या बाल समाज या नावाचे सभेचा त्रैय मासीक भाषण समारंभ झाला. तो पाहण्या करितां व्यवस्थापकांचे विनंती वरून बरेच सभ्यगृहस्थ गेले होते त्यात मे. डायरेक्टर साहेब, ए. इन्स्पेक्टर, हायस्कूलचे हेडमास्तर, म्यु. क. चे व्हाईस प्रेसिडेंट व कमेटीचे मेंबर्स वगैरे ठळक ठळक लोक ही दृष्टीस पडले. एकंदरीत पांच साहा लाहान लाहान मुलांनीं जीं भाषणें केलीं त्यांत एक दोघांचीं तर त्यांचे वयाचे मानाने फारच उत्तम झालीं यांत संशयनाहीं. पैंकी त्यांनें समाजाचे चिटणिसानें एकंदर व्यवस्थाकशी आहे व तिचे नियम काय आहेत व पहिले तीन महीन्यांत काय केले या बद्दल हकीकत, वांचून दाखविली. भाषणें संपल्या नंतर रा. रा. सदाशिव विष्णू भागवत यानीं आपल्या नेहमींच्या वहिवाटी प्रमाणें हस्य रसोत्पादक पाच चार उत्तम कोट्या करून मुलांस उत्तेजन परवा शाळेच्या हेडमास्तरचे स्तुतिपर बराच वेळ भाषण केले. नंतर डायरेक्टर साहेब यानीं समयास अनुसरून थोडक्यांत आनंद प्रदर्शित भाषण केलें. शेवटीं रा. रा. भागवत यांनीं समाजाचे तर्फे सर्व मंडळीचे आभार मानल्यावर मुलांनींच हार तुरे वाटल्यानंतर सभा विसर्जन झाली. ह्या वेळेस सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखी व आनंदाची अशी एक गोष्ट दिसून आली कीं ह्या समाजांत बहुतेक हिंदु मुलें असून त्यांनीं आपले पैंकिच कोणी चिटणीस व खजिनदार नेमले असून अध्यक्षाचे जागीं मात्र एक मुसलमान जातीचे मुलाची नेमणूक केली आहे.

---

मागें हैद्राबाद एथील 'टेलिग्राफ' या नांवाचे पत्रावर मोकदमा होऊन हाय कोर्टाने निकाल केल्याचे आमचे वाचकांस माहीत आहेच. हल्लीं त्या मोकदम्यांत सामील असलेले मि. अली अबदुल्ला पागेवरील सुपरिंटेंडेंट कप्तान अहमद अबदुल्ला व व्हान इंजन जड्ज्य ह्या तिघाना निझाम सरकारनीं मे रेसिडेंट साहेबांच्या मंजुरतीनें खालीं लिहिलेल्या शिक्षा दिल्या. पहिल्या इसमास नोकरी वरून बरतर्फ केले व पुन्हा कधींहीं नोकरीवर न घेतां हद्दपार केले. दुसऱ्याचा पगार १०० रुपये कमी करून तूर्त पोलीसचे हाताखाली काम करावें. व तिसऱ्यास जड्ज्याचें काम करण्यास नालायक म्हणून तूर्त कामावरून दूर केले आहे असे मुंबई ग्याझेट वरून कळतें.

---

नाटकांत राक्षसी पार्ट रंगभूमीवर येते वेळीं जसा आरडा होतो, तद्वत मोहरम सुरूझाल्यापासून रस्त्यांतून दूला दूला असा शद्ब करीत व ताशे बडवीत पोरांच्या झुंडी इकडून तिकडे फिरतांना दृष्टीस पडतात. गेल्या तीनवर्षांत हिंदूची कार्तिकी व मोहरम यांची गांठ पडली होती म्हणून उभयतांत अनेक ठिकाणी हातघाईवर प्रकरण येऊन ठेपलें होतें. परतु आमच्या सरकारच्या उत्तम बंदोबस्तानें सर्वत्र शांतताच राहिली. यंदा दसरा मोहरमांत आला आहे, आणि हिंदुची

आऱ्हदिवशी वाजत गाजत सामील घनास जाण्याची पुरातन चाल आहे; म्हणून उभयपक्षांचीं मनें आवस्थ आहेत. कोणत्या ठिकाणीं गडबड होण्याची भीति आहे, हें मागील अनुभवावरून सरकारात माहीत झालें आहे. तरी त्या ठिकाणीं योग्य बंदोबस्त होईल यांत शंका नकोच. आमच्या ऐकिवांत आहे कीं प्रत्येक पक्षानें आपल्या वहिवाटी प्रमाणे आपापला जुलूम करावा, कोणी कोणाणास हरकत न करूं नये अशा मतलबाचा हुकूम मे डि. कमिशनरसाहेब यांजकडून तहसिलदारांस सुटला आहे हें खरें असेल, आणि असण्याचा बराच संभव आहे, तर फारउत्तम झालें अशी तंटल्या वांचून आमच्यानें राहवत नाहीं.

# The Berar Samachar

**MONDAY, OCTOBER 19 1885**

## MOHORRUM AND DASARA HOLIDAYS.

This year it so happens that the Dassara holiday of the Hindus and the Mohorrum of the Mohamedans came together. In Berar especially the fact is very significant, as the coincidence is sure to result in serious quarrals between the two people. Mohamedans forming not an inconsiderable portion of the community. The traditions of the people of both persuasions are so steadfastly fixed in the minds of the people, that it is not a very easy task to dissuade them from doing certain things offensive to each other. Precautions are being taken to prevent breach of the peace, in several places where a quarrel is expected. In the Amraoti district alone, orders have been sent to Kurha, to Morsi, to Kholapur, to Mortizapoor and other places, as regards the beating of tomtoms by the Hindus in certain places and the avoiding of it in certain others. We doubt very much, however, the wisdom of any such measures; first because no such orders are sustainable under any of the existing laws; for instance, the order that there should be no beating of tomtoms near the Mohamedan Mehjeds or places of worship, ten paces on either side, cannot be sustained under any law existing in Berar; and we dont know what the law can do if they are disobeyed; secondly, such orders, cannot be considered to be fair and equitable unless the Mohamedans are also ordered to show the same respect near the Hindu temples; thirdly, the orders show a yielding to very unreasonable demands of the Mohamedans, because if public roads are really for the use of the *public*, the reason why a particular class of persons should not be allowed to have their tomtoms while passing on public roads, is not easy to discover. The circular by the Commissioner of Berar (the father of the present Deputy Commissioner Amraoti) in 1854, is, we believe, a very just one, as it allows the Hindus and Mohamedans, to celebrate their respective holidays according to the immemorial customs and traditions of the people; tomtoms are allowed free on public roads and everybody is to go on according to his *deen*. The Mohamedans of these days have it seems grown more unreasonable in their demands, and the authorities are going to concede to them. What effect this concession has on the Mohamedans will appear from a story from Amraoti. A man used to make idols of Hindu gods in his own place at Amraoti; the Mohamedans threatened to break the idols, if he did not put a stop in preparing them. The poor fellow who made his daily livelihood by making a show of the idols, had to give up his business, as the authorities insisted on his so doing. This is quite a new phase on which the demand of the Mohamedans has entered, and the authorities have yielded to it. We think this is not securing peace, but embittering Hindu feeling.

This is not the way to see that all goes on well. When in a place like Bombay, there is something to be feared the Police are scattered all over the roads, and order is maintained by posting an efficient body of Police wherever necessary. So matters go on as smoothly as may be desired without the aid of any such orders, which savour of undesirable distinctions between the two classes.

---

We hear that on the next Saturday Mr. D. V. Bhagwat B. A. L. L. B. is going to read a paper on "religion" in connection with the series of lectures that are continued in the B. D. N. G. Library Akola.

---

To.

The Editor of the Berar Samachar.

The Vaidarbha in its immediate last three issues has given a conspicious insertion to three articles of the proposed series on the subiect of Female Education in India. These may have been read with great and careful attention in many quarters and supplied many with a fresh but unwholesome food for hot discussions. It is evidently the intention of these productions, the author of which is undoubtedly an alien, to prepare or rather induce the Educated Native minds to accept and introuce more widely in their country and amongst their families a measure which is likely to govern materially the destinies of the present and future daughters of India, without showing the extent of its sutability to which it can be accepted in connection with the social and domestic requirements. The writer could not be expected to do more justice to the subject than any other person similarly situated. The short.comings are excusable from the simple fact that the writer is a stranger and therefore necessarily ignorant of the manners and customs of the natives, of the variations, these undergo in different societies and lastly of the domestic life and duties of men and women in different families. The readers could have been well spared this imposition, the journal, the waste of its columns and the compositors, their labour. For, the first article is an unnecessarily long and tedious prologue of the subject. In the second the chief point considered at much length is that "if women are educated there is great danger that they will be less chaste." The third article could have been much more acceptable and useful to the devout Christians than to the Educated natives who have now a much better idea of Christianity than before and who think that they are in a position to do without the precepts of the Gospel. With regard to the argument advanced by the opposers of the Female Education and considered in the second article of the series, well might the promoters of this measure and also those to whom any Western steps towards the so called improvement is admiration, reject and laugh at this. But there may nevertheless be some truth in it. The terrible disclosures recently made by the Paul Mall Gazette will strengthen this argument. England is said to be the first class civilized country in the world and London the chief seat of it. The daughters of the soil are educated and said to be the accomplished Ladies whom it is proposed and advised that the daughters of India should follow. But what says the Paul Mall about their morality? Its low standard should be the least enviable, and if it is not due to Female Education, it may be very interesting to know what is it the result of. It is not at all for a moment contended that Femal Education is altogether unnecessary. But it is yet to be determined what sort of education there should be, and to what extent, and under what system shall be given in the present social and religious condition of the country,

It must be remembered that the standard and nature of Education of the English ladies will not well suit the Indian girls, whose manners, customs and social and domestic requirements are materially different from those of their white sisters. Patience will not be tiresome to wait, to see how the difficulties are meant to be surmounted by the writer and by those wild and inexperienced admirers of the western civilization who wish to adopt and promote the measure with raptures but blind-fold eyes.

"Trinity"

Some of the remarks made above are not in harmony with our views on the subject. We, however reserve our comments until our contemporary finishes his articles on Female Education.

Editor B. S.

---

## वऱ्हाड.

आकोला हिंगोली स्टेटरेल्वे लायनाचे सर्वे, नकाशे, एस्टीमेट वगैरे करण्याचें सर्व काम आटोपल्यामुळें येथें त्या संबंधानें असलेले आफिस मोडल्यामुळें कर्नल नटाल ए. इं. यांस डायरेक्टर जनरल आफ स्टेट रेल्वे यांचे हाताखालीं नेमलें. मि. गोविंद राव फ. ग्रे. ओव्हरसियर यानां माहीतला बाकेंट नेमले व बाकीच सर्व नोकर तूर्त येथील ए.इं. चे आफिसात ठेविले आहेत.

अखेरीस मि. शापुर्जी साहेब यानांच तहशिलदाराचे जागीं कायम केले. मि. रेहण खेडकर यांचे हक्काकडे मे. रेसिडेंट साहेबांनींही दुर्लक्ष केले हे पाहून आम्हास त्याबद्दल वाईट वाटतें.

येथील ए. इं. चे जागीं मि. कूड साहेब यांस आक्टिंग नेमल्याप्रमाणें त्यांनीं गेले शनिवारी आपले कामाचा चार्ज घेतला. आतां मि. स्विनर्टन हे इलिचपूर येथें नवीन होणाऱ्या डिव्हिजनचा चार्ज घेण्याकरितां जातील.

हल्लीं जी आकोला हिंगोली स्टेट रेल्वे करितां लाईन मारली आहे ती बरोबर नसून बारशी टाकळी कडून लाई[illegible]ली होईल असे सु. इं. यांचे [illegible] नटाल साहेब यांचे म्हणणें असून नवीन लाईनीची सर्वे लवकरच पुन्हा सुरू होणार असल्याचे कळते.

रा. रा. कृष्णाजी दिनकर सब इंजिनिअर यांची बदली येथें झाल्या प्रमाणें ते काल रोजीं एथें येऊन दाखल झाले.

येथें असलेले पोष्ट मास्तर मि. ताजुद्दीन यांची बदली हुसंगाबादेस झाली व तेथील पोष्ट मास्तरास येथें बदलले.

मागें लिहिल्याप्रमाणें रा. रा. कृष्णाजी मल्हार यांस येथें हायस्कूलांत आक्टिंग असिस्टंट मास्तरचे जागीं न आणतां तूर्त रा. रा. बाळकृष्ण मोरेश्वर साठे यांसच थर्ड अ. मा. नेमले.

खामगांव तहशिलींत आक्टिंग काम पाहत असलेले नायब तहशिलदार मि. आबदुल कदूस यास दारव्ह्यास कायम नेमले व रा. रा. माधवराव बळवंत बो[illegible]डीकर यांस खामगांव तहशिलींत आ. ना. तहशिदार नेमले.

यंदा हिंदु व मुसलमान लोकांचे सणांचा दिवस येकच आल्यामुळें कांहीं ठिकाणी दंगा होण्याचा संभव दिसल्यामुळें मि. देवीससाहेब पर्वा पातुरास गेले होते. व त्यांनीं कांहीं तडजोड ही केल्याचे समजते. बारशीं टाकळी एथें तर खद तहशिलदार साहेबांची स्वारी असून पोलिसाचीही कडेकोट तयारी आहे.

येथील मुलींचे शाळे करितां एक नवीन शाळा गृह बांधण्याचें काम सुरू होतें तें संपलें. त्याचा प्रवेश समारंभ दसऱ्याचे सुमुहूर्तावर करण्याचे मंडळीच्या मनांत घाटत होते परंतु कांहीं मतभेद झाल्यामुळें तूर्त ते काम लांबणी वर टाकल्याचें कळते.

एथील म्युनिसिपाल हद्दींत राहणारे लोकांचे सोई करितां देवीकाढविण्या साठीं मे. सानिटरी कमिशनर साहेबानी मुद्दाम एक व्याक्सिनेटर दोन महिने पावेतों ऐथें ठेविला असून देवी काढण्याचें काम मु.क. चेमेंबर वगैरे लोकांचे मदतीनें फार झपाट्यानें चालले आहे परंतु लिहिण्यास वाईट वाटते की चांगली लस मिळण्या करितां पाहिजे त्यांच्या गाई पकडून आणतात व त्या बद्दल तक्रार केली असतां कोणी दादही घेत नाहींत. गेले आठवड्यांत रा. रा. सखाराम मोरेश्वर मांजी खजिनदार यांची गाय धरून आणून देवीही काढल्या होत्या परंतु त्यांनीं लागलीच झालेले जुलमा बद्दल व्हाईस प्रेसिडेंट यांजकडेस तक्रार केल्यामुळें जबरदस्तांचे सांद्यावर या न्यायानें त्यांची गाय लागलीच सोडून देण्याचा हुकूम केला. या बाबदींत आम्हास ज्यास्त लिहिणें आहे ते सवडीनुसार पुढें लिहूं.

---

## वर्तमानसार

रा० ब० मा० गो० रानडे यांस डा० पोलन रे० नउज यांचे जागीं नेमिलें.

बंगाल इलाख्यांत जलप्रलयामुळें २,८६९ चौरस मैल जमीन जलमय होऊन पीक अजीबात बुडालें. स्थूल मानानें ज्या ठिकाणीं कधींच पाणी नसे त्या ठिकाणीं सहा आठ फूटपर्यंत हल्लीं पाणी आहे. यामुळें एकंदर १७,१९,००० लोक अगदीं निराश्रित झाल्याचें समजतें.

रशियन सरकारचा विचार प्रिन्स अलेक्झांडर यास पदच्युत करण्याचा आहे असे रशियन वर्तमानपत्रकारांच्या लिहिण्याच्या झोंकावरून दिसतें असें सेंटपिटर्सबर्ग येथून आ[illegible] बातमीवरून समजतें.

मदें होते

हैद्राबादची कांटिंजेंट फौज फार तयार आहे, तिचा हिंदुस्थानच्या फौजेंत समावेश करून तिच्या खर्चा करितां ब्रिटिश सरकारानें आपल्याकडे ठेवलेला वऱ्हाडप्रांत निझामास परत द्यावा—अशी एकाची सूचना आहे. पण वाघाच्या घशींत शिरलेली शेळी जीव घेऊन परत आल्याचें आम्ही तरी कधीं ऐकिलें नाहीं. तथापि मि ग्लाडस्टन सारख्या मुत्सद्याच्या हातून धृतराष्ट्राच्या राजा प्रमाणें निजामावर ही कृपादृष्टि होण्याचा संभव आहे. प्रयत्न करून पहावा. येरले सालारजंग असते तर या कठिण कामांत यश येण्याचा अधिक संभव होता. के०

इंडियाआफीस.—विलायतेंत हिंदुस्थानासाठीं म्हणून जें इंडियाआफीस ठेविलें आहे, त्यांतील लोकांच्या पगाराबद्दल सालिना खर्च १४६३३९० रुपये होतो. लोकांच्या पगारा शिवाय प्रतिवर्षी जो खर्च येतो तो धरून ह्या आफिसाच्या संबंधानें दरसाल २३०९१२० रु. खर्ची पडतात. जवळ जवळ २५ लक्ष रुपये लागणारा जो हा खर्च तो पैनापै हिंदुस्थानाला चुकता करावा लागतो. इंडिया आफिसाबद्दल होत असलेल्या खर्चापैकीं विलायत सरकारच्या तिजोरींतून एक कवडी सुद्धां दिली जात नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. लोकोपयोगीं कामें बंद ठेवणें, विद्यावृद्धीचें काम तहकूब करणें, कैदी लोकांचें खाणें तोडणें, दुष्काळपिडीत लोकांस उपाशी मरूं देणें, व शेकडों गरिब लोकांस नौकरीवरून दूर करणें, असले दांत मोरून पोट भरण्याचे इलाज करण्यापेक्षां इंडिया आफिसाकडे होणारा आमच्या पैशाचा फन्ना जरा कमी केला तर पुष्कळ पैसा वांचून हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींतील आलेली तूट बरीच भरून येणार नाहीं काय?

गोदावरी प्रांतांतील नरसपूर तालुक्यांत नुकतीच एक गंधकाची खाण सांपडली आहे. एक ओसाड पडलेली जमीन सहज खणीत असतां तिची माती वरखाल झाली, व त्या मातीचा रंग चमत्कारिक दिसत असल्यामुळें तथील माजिस्ट्रेट सहज तिकडून जात असतां त्यांची नजर तिजवर गेली. त्यांनीं तेथील थोडी माती घेऊन ती सिविल सर्जनाकडे पाठवून दिली. त्यांनीं तिचें पृथक्करण करून पांहतां तींत गंधक आहे असें त्यांस दिसून आलें. नंतर त्या जमिनीची परीक्षा केली तेव्हां तिंत बरेंच लांब पर्यंत गंधक सांपडतो असें दृष्टीस पडलें.

म्हैसुराकडे पावसाची अजून हाकाहाक आहेच. चिनापट्टमच्या पलीकडे पुष्कळ शेतें लागवडी वांचून तशींच पडलीं आहेत, यामुळें तांदुळाचा भाव फारच वाढला आहे; लोक अगदीं हवालदिल होऊन गेले आहेत. ब्रिटीश रेसिडेंट मि. गर्डलस्टन हे दसऱ्यासाठीं म्हैसूर येथें जाणार आहेत. त्यावेळीं ते, महाराज व दिवाण मिळून लोकांस मदत करण्यासाठीं काय तजवीज करावी याचा विचार करणार आहेत.

तंजावर येथील स्टेशनमास्तर गुलाम मोहिउद्दीन साहेब यांस व्हाइसराय साहेबांनीं खान बहादुर किताब दिला.

फाल्स पॉइन्ट येथें जें वादळ झालें त्याच्या योगानें ५०० गांवांचा नाश झाला असें कळतें. ... देणें भा...

नेव्हिल केसच्या संबंधानें आणखी एक नवीनच प्रकार उपस्थित झाला, तो असाः—हैद्राबाद टेलिग्राफचे मालक मि. एडवर्डस यांनीं मि. मेहेंदीअल्ली, नवाबनवाजजंग यांस त्यांजवर व व्हरनर यांजवर मेजर नेव्हिल यांनीं आणलेले खटले चालविल्याबद्दल देऊं केलेल्या १५००० रुपयांपैकीं बाकी राहिलेली ७००० रुपयांची रकम पाठवून देण्याविषयीं एक पत्र लिहिलें; त्यांत त्यांनीं, रक्कम जर लवकर पाठवून न दिली तर या खटल्याच्या संबंधानें मजपाशीं असलेली आपली, मुनीरउलमुल्क, मि, मेहेंदी हसन व इतर लोकांचीं पत्रें मी उघडकीस आणीन असें लिहिलें होतें. तें पत्र मि. मेहेंदी अल्ली यांनीं एकदम मिनिस्टराकडे पाठवून दिलें. त्यावरून मि एडवर्डस यांस बोलावून आणून त्यांनीं असें सांगितलें कीं तुम्ही तें पत्र माघारें घेऊन क्षमा मागाल तरच तुमचा छापखाना व पत्र सुरक्षितपणानें चालेल नाहीं तर तीं बंद केलीं जातील.

विजेच्या योगानें लोणी काढण्याची युक्ति निघाली आहे. तिच्या योगानें सुमारें १७५२०० शेर दुधाचें लोणी साडे चार मिनिटांत काढतां येतें, व साधारण रीतीनें काढलेल्या लोण्यांत व यांत बिलकुल फरक नसतो. ने० ओ०

इंग्रज सरकार एतद्देशिय संस्थानिकांचें लष्कर उपयोगांत आणण्याच्या विचारांत आहे.

लंडन शहरांत लार्ड रिपन यांनीं एक लहानसें वर्तमानपत्र सुरू केलें आहे असें ह्मणतात.

मि. हरिदास विहारीदास जुनागडचे दिवाण यांनीं मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें तीन नवीन स्कालरशिपा दिल्याचें समजतें.

अंबच्या नवाबाच्या जाहागिरींतील लोकांस हत्यारांच्या प्रतिबंधाचा कायदा लागू नाहीं असा गव्हर्नरजनरलांनीं ठराव केला.

---

नोटीस.

रा. रा. रामचंद्र यशवंत राहणार जळगांव तालुके मजकूर जिल्हा आकोले यांस नोटीस देणार ब्याहारीलाल हिरालाल अगरवाले साहू दुकान पेठ अवरंगपूर प्रगणें पंचगव्हान तालुके आकोट जिल्हे आकोले. यांजकडून देण्यांत येते कीं. तुम्ही व आम्ही आफू, गांजा, अपकारी कलाली मक्ते सन १८८५।८६ साला कारणें आकोले येथें हरास होऊं लागले त्या वेळेस उभयतांत असा नेम ठरला कीं, दोघे मिळून निमे निमेच्या पातीनें मक्तें घेऊं. त्याची व्यवस्था सर्व प्रकारची उभयतांच्या अनुमतें करूं, असा उभयतांत करार करून त्या प्रमाणें आपसांत एक रुपयाच्या स्टांपावर लेखी करार नामे ही झाले आहेत. त्याप्रमाणें तालुके आकोट व तालुके जळगांव आणि आकोली जाहागीर तालुके आकोट या प्रमाणें तीन मक्ते आपण केले.

१ सदर्हू वर लिहिले प्रमाणें मक्ते दोघांचे नांवें मंजूर झालें. त्याप्रमाणें आकोट तालुक्यांत जामीन आम्ही पटविला व जळगांव तालुक्यांत जामीण तुम्ही दिली. व आकोली जाहागिरची पेशगी भरण्यासतव त्या पेशगी करितां आम्ही तुम्हांस जळगांव तालुक्यांत जी मागील मक्त्याची आमची आफू शिल्लक राहिली होती ती तुम्हास त्या ऐवजात मोजून दिली. मिळोन पेशगीबद्दल आम्हीं तुमची भरपाई केली; त्याबद्दल तुमची तकरार राहूदिलीनाहीं.

२ शिवाय दोन्ही तालुक्याचे एकंदर मक्त्याचें काम सुरूं करण्यासाठीं तुम्हास सुमारें ५०० रुपये पर्यंत नगदी दिले.

३ आपले लेखी ठरलेले नेमांत असें आहे कीं, जे पोट मक्ते उभयतांचे अनुमतें जें लागतील तें लावून जेगांव लागणें रहातील, त्या गांवास विकरी करितां वगैरे एक मनुष्य आमचा व एक मनुष्य तुमचा या प्रमाणें नवकर ठेऊन तेथील विक्रीचें काम सुरळीत चालवूं; त्यांत नफा तोटा वाटून घ्यावा. असें ठरलें असतां तुम्ही त्या ठरावा प्रमाणें बिलकुल वर्तन नकरितां तसें चालला नाहीं असें नजरेस आले. व तुमचें मनांत कपट व दगा उत्पन्न झाल्याचे तारीख १ एप्रील पासून मक्त्याची सुरुवात झाली. नंतर पुढें थोडे दिवसानेंच आमचे नजरेस आलें या करितां आम्ही मक्त्याच्या कामांत पुढें हात नघालतां तुम्हास मुद्दाम पंचगव्हान येथें बोलाविले त्या प्रमाणें तुम्ही तीन च्यार वेळां पंचगव्हान येथें दुकानावर आला. त्यांत एकवेळ असें टरलें कीं, एक तालुका तुम्ही घ्यावा व एक आम्ही घ्यावा असें आपसांत ठरवूं. तुम्ही मात्र इतकेंच अंतर ठेविलें कीं, मी आपल्या मुखास विचारून हा ठरलेला नेम करारनामे करून पुरा करूं, असें म्हणून निघून गेला. त्यास एक महिना पर्यंत तुमची येण्याची वाट पाहिली; नंतर तुम्हास मुद्दाम मनुष्य ही पाठविला, व पत्रही लिहिलें. शेवटीं आमचा बंधू रामुलाल यांस ही तुमचे कडेस पाठविला. त्यासही भेटून धड जबाब नदेतां मुदती करून आजपर्यंत सहा महिने लोटले. परंतु सहा महिन्याच्या आंत एकही ठराव कायम न करितां व आपले उभयतांतील लेखी नेम कांहींच सिद्धीस नेला नाहीं. आणि आपल्या मक्त्यासंबंधीं आजपर्यंत जमा व खर्च काय झाला, व त्याचा हिशेब खरे प्रकारचा आम्हास दाखविला नाहीं. असें तुम्ही सहा महिने लोटले; यास्तव स्पष्ट दिसून येते कीं, तुमचे मनांत आम्हास दग्यानें फसवून बुडवून नुस्त्या भुलथापा देण्याचे येऊन तालीम वर्षे त्यांत गुजरविण्याचे दिसते. यास्तवः—

४ या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं ज्या वेळेस आपण दोघे मिळून दोन्ही तालुक्याचे मक्ते बोललों व त्याबद्दल लेखी करार नामे झाले याजवर तुम्ही बिलकुल निघा न पुरवितां आपले स्वतःचें मन मानेल त्या प्रमाणें वर्तन करिता हे तुम्हांस अगदीं रास्त नाहीं. सबब तुम्हास असें कळवितो कीं, तुम्ही तारीख १ एप्रील सन १८८५ इसवी पासून तारीख ३० सप्तंबर सन मजकूर पर्यंत सर्व दोन्ही तालुक्यांचे खरेदी व विक्री नफा, व नुकसानी जी कांहीं झाली असेल, ते तुमचे तुम्ही पाहून घ्यावें. आणि ही नोटीस तुम्हास पोंचेल त्या दिवसापासून चार दिवसांचे आंत तारीख १ आक्टोबर सन १८८५ इ. पासून पुढील सहा माही मक्त्याचें काम दोन्ही तालुक्याचे व आकोली जाहगीर सुद्धां बीन तकरार आमचे हवाले करावें. त्याजवर आम्ही आपले नवकर वगैरे ठेऊन जमा खर्च आमचा आम्ही पाहून घेऊं. व नफा तोटा आमचा आम्ही सांभाळूं. तुम्हास तोसीस लागूं देणार नाहीं. ही एक आतां आपसांमध्यें तंटा न होता सुरळीतपणें निकालाची रीत आम्ही काढिली आहे. शिवाय तुम्हास ५०० रुपये पर्यंत जे रोख दिले आहेत, ते तुम्ही घेतले दिवसापासून दर महा दर शेंकडा २ रुपये व्याजा सुद्धां आमचे आम्हास परत द्यावें.

५ आफू, गांजा, व कलाली बद्दल जे पोट मक्ते दिले गेले आहेत त्याजकडून तुम्ही पेशगी वसूल केली आहे ती रकम तुम्ही पुढील सहा माहीच्या वहिवाटी करितां आम्हास रोख द्यावी व ज्याजला पोट मक्ते दिले आहेत; त्याजकडून महावारीचा वगैरे वसूल जो तुम्ही घेतला आहे, व पुढें त्याजकडून किती रकम वसूल येणें आहे, त्याजबद्दल एकंदर त्या लोकांची आम्हासी रुजवात करून द्यावी.

६ वर लिहिलेल्या रकमा ज्या तुमचे कडून रोख येण्याच्या आहेत त्या आम्हास व्याजासुद्धा सर्व तारीख १ माहे आक्टोबर सन १८८५ इसवी रोजी द्याव्या ते दिवशी न दिल्या तर पुढें ही तारीख १ आक्टोबर पासून जो येणें राहिलेली रकम असेल तिचे व्याज वर लिहिलेल्या करारा प्रमाणें तुम्हास द्यावें लागेल.

सदरहु प्रमाणें तुम्हांस कळविलें आहे तरी आतां दोघांमध्यें विनाकारण तंटा चालूनये, व खर्चाचा प्रसंग न यावा यास्तव तारीख १ आक्टोबर पासून दोन्ही तालुक्याचे मक्ते व कलाली या सुध्दां सर्व वहिवाट आमचे स्वाधीन करावी. तसें तुम्ही न केले तर या नोटीशीचे खर्चा सुद्धां व शिवाय आमच्या हिशांचे नफ्याबद्दल रुपये १५०० व तुम्हास रोख रुपये दिले ते व आफू दिली त्या सुद्ध व्याजा सहीत दिवाणांत फिर्याद करून जे नुकसानी होईल ते भरून घेतली जाईल. तारीख ३०-९-८५ इ०

(सही) ब्याहारीलाल हिरालाल साहु दस्तुर खुद.

---

☞ हें पत्र आकोला येथें के.वा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

form of government having been a distinct ;in to her, cannot be gainsaid, notwithstanding the formidable array of innumerable evils which some people can present to counterbalance this great benefit. It has been the one consistent policy of advanced liberal statesmen in England to adopt measures to *formulate* the people of this great dependency, if we may use the expression. England is to *prepare* the people of India for self-government; the present government is a mere trust. If this be the real object in view, as professedly it is, gradually, the more advanced from amongst the natives must be associated with the conduct of government; and doubtless the educated natives will be found to be of very great use in the furtherance of this object.

There has been a class of people always making a mountain of a mole, by charging the natives with rank sedition and romping disloyalty; who can snatch at a most insignificant thing like the 'National Anthem' business the other day at Poona and manage to give it colors which must delude so long as there are people that can manage to delude and people who can afford to be the credulous victims of any gibberish nonsense about educated natives that may be put to them. It is to be regretted that there is in India a class of people who are the cause of creating discontent between two classes of Her Majesty's subjects; the sooner this class is ignored, the better it will be in the true interests of British rule in India.

Every one in India will be waiting with anxiety the result of the coming General Election. Appeals are being made to the electors in England on behalf of the Indian people for a commission of enquiry into the state of the government of India; and delegates have been sent to England to represent the views of the Indian people. It is to be hoped that things will come to pass in a manner that would cause a change in the position of educated natives in the politics of our rulers.

## BERAR DEPARTMENTAL EXAMINATIONS.

Departmental Examinations are held annually in almost all the provinces of India that are directly under the British control. These examinations have certainly a very wholesome effect upon the respective branches of administration if they are arranged and conducted in a satisfactory manner. In the province of Berars they were introduced along with certain other reforms that were found necessary during the early period of British administration, The Berar examinations should have been, from time to time altered and made suitable to the changed circumstances of the province. The attention, however, of our local Government has not as yet been sufficiently directed to this subject. The people of Berars have been gradually progressing socially, morally and intellectually. In his recent visit the Resident Mr. Cordery was agreeably surprized to find the vast improvement that has taken place since his transfer from the commission to Upper India. In years past the officers that were appointed to rule the destinies of the people of this province were not perhaps required to be so well educated in all the branches of civil, criminal and revenue laws as they find it necessary now. Litigation in the beginning was simple. But the state of altered circumstances has forced it to assume gradually a different form. In our Courts there were comparatively few cases regarding contract, tort, mortgage, transfer of property, trust, Hindu and Mohamedan laws &. But along with the intellectual growth of the people and the growth of commerce & the number of such cases has become vastly increased. The judges in our courts, however, are ignorant of those laws and consequently find it a very difficult task and in many cases fail to deal satisfactorily with questions requiring the thorough knowledge of those laws. We therefore request the local government to see their way to make necessary alterations in the subjects of these departmental examinations with a view to secure an efficient administration of Justice. Even if the much talked of judicial scheme of the Resident be sanctioned we think no other competent officers will be imported but the scheme will have to be worked out by the present staff of officers.

This years Departmental Examinations began on Monday, the 12th October and ended on Thursday the 15th instant. The question papers were comparatively easy and were such as would give no room for candidates to complain except in the oral examination in marathi in which some out of the way questions were asked. Marks ought to have been assigned to almost all the papers so that it would have been well for the examinees to use their discretion in writing their answers. On the whole the nature of the papers warrants us in believing that the result of this year's examinations will not be as bad as that of the last year. On the first day the question-paper was dictated, which as expected produced some confusion. The board of examiners, however, took immediate steps to avoid it on the next day. There should have been stricter supervision while the candidates were writing their answers. The noticeable point in this examination was that some few candidates were so much unprepared that they were seen doing nothing but lounging on their seats and trying to find means to kill the time which hang heavily on them. The Commissioner was not slow to take notice of it and further on in the oral examination in Marathi these examinees were directed to make no further attempts as they were not prepared.

Some people are rather surprized to find that such persons were certified by the district officer as competent to appear for the examination. But on a moments thought they will not find it unusual if such officers are recommended by the district officers for powers Civil and Criminal. The Judicial Commissioner endorses the recommendation and the local government at one stroke arms them with powers to be exercised on the people of Berar. It is never too late to correct a mistake. If through insufficient inquiry and erroneous judgment on the part of superior authorities they were found competent to exercise such powers, we see no reason in the case of their utter failure in these examinations why they should not be withheld from continuing to exercise those powers until they are sufficiently qualified. We have no paucity of officiers just now and we therefore think that such a step would not creat any administrative inconvenience but on the contrary will have a salutary effect. The time honoured prudent policy of making officiating appointments at first is very sound one and on no account, should be swerv d from. These fortunate nominee ...ould not have been confirmed until they stood all the necessary tests. In similar cases in future we hope the government will not repeat the mistake. We conclude our present comments with a remark "better than never-"

---

It is settled that Mr. Henvey goes to Jeypore to succeed Dr. Stratton. Mr. Plowden will probably act at Oodeypoor for Colonel Walter who goes on 6 month's furlough, Major Trevor taking Mr. Plowden's place at Ajmeer.

---

THE INDIAN VIGILANCE LEAGUE.--What many flaming placards declared would be a monster meeting called by "The Indian Vigilance League," and at which five thousand poor were to be twice fed, and a thousand special constables were to maintain order, proved, we are told, to be but gathering on Sunday evening on the Monument Esplanade, of about three hundred half-clad native school-boys--some of whom were doubtless the usual Sunday evening cricketers--belonging principally to Patcheappah's Institution and the Christian College. The orators who were to address the meeting from twenty-four different platforms were represented solely by Mr. Stevens Howard, who during the last three or four years has figured more than once in the police reports of the Madras newspapers ueder the names of Holt and Howard, and who was released from the Penitentiary on bail last Friday. We mention the orator only in order that such of our readers as may need the information may know who is the ruling spirit of "the Indian Vigilance League." He made a long speech, in which he attacked the Governor, the magistracy, the police and the local press, but was two or three times interrupted by the Deputy Commissioner of Police, Mr. Simpson. When the speaker honoured one individual more especially by his aspersions, Mr. Simpson warned him that the police would not be responsible for the consequences of so speaking. Howard declared that a member of the Civil Service was prepared to come forward and denounce the Government, but refused to mention his name to Mr Simpson, who advised him to address the meeting on the object of the League instead of attacking the police and the magistracy. We understand there was one exception to Mr. Howard's sweeping censures, in the case of Mr. Simpson himself; though what he had done to deserve this besides being present at the meeting, we cannot tell. Poor Mr. Simpson! The audience of schoolboys seemed to enjoy the whole of the proceedings as great fun. The feeding and the petitionsigning seem to have been altogether omitted in carrying out the programme.---*Times*.

---

## वऱ्हाड.

हवामान—पाऊस निखालस गेल्यासारखा झाला आहे, परंतु केव्हां केव्हां उष्णता होऊन ढग निघतात. वऱ्हाडांत चोहोंकडे पिके चांगलीं आहेत. रोगराई म्हणण्यासारखी कांहीं विशेष नाहीं.

आपघातानें मृत्यु—मि. ह्यामरेट ओकलफन्ड ओव्हर सियर यवतमाळ हे तेथील तळावांत नावेंत बसून फिरत असतां नाव उलटी झाल्यानें बुडून मरण पावले.

येथील हुजूर नाजरचे जागीं मि. विठुजी नारायण यांस कायम केलें. व यांचे शिरस्तेदारीचे जागीं आकोट तहशिलींतील रा. रा. बाळाजी नारायण कारकून यांस नेमिलें.

येथें मुसलमान लोकां मध्यें आज पर्यंत बरेच दिवस मोहरमच्या मेळ्याची दुफळी होती, परंतु येथील इनामदार मि. मिरजा आबासबेग यांनीं सक्त मेहनत करून सर्वांची एकी केली.

मे० महमंद यासीनखां आसिस्टंन्ट कमिशनर साहेब यांस एक महिन्याची हक्काची रजा ते घेतील त्या दिवसा पासून मिळाली.

रा० रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे ए.अ. क. जि. उमरावती यांस १०००रुपये पर्यंत दिवाणी काम चालविण्याचा व तिसरा वर्ग माजिस्ट्रेटचा अधिकार दिला.

येथील मुलींचे शाळेकरितां नवीन इमारत बांधली आहे त्याचा प्रवेश समारंभ ता. २ नोवेंबर रोजीं होणार असून मे. डे. क. साहेबांची स्वारी ही त्यावेळीं येथें येणार असल्याचें कळतें.

मे. यासिनखा साहेब हे मराठी भाषेच्या हायर स्टांडर्डचे परिक्षेंत पास झाले व त्यांना अ. सेकंडक्लास अ. क. नेमलें.

हैद्राबाद व्हालंटीयर पैकीं एक कंपनीचे मि. डनलाप साहेब यांस क्यापटन नेमलें.

ले. क. गन्थार्प साहेब डि. सु. पोलीस हे रजेवरून परत येऊन गेले शनिवारचे गाडीनें उमरावतीस गेल्याचे समजतें. आतां त्यांची नेमणूक कायम कोठें होती तें पाहावें.

गेल्या तारीख १८ पासून तेल्हाऱ्यास "सज्जन सुधापान" ह्या नांवाचें एक वर्तमानपत्र हिंदी भाषेंत शिळेवर निघूं लागलें आहे. त्यांच्या कर्त्यां कडून एक अंक आम्हास आला त्याचा आम्ही आभार पूर्वक स्वीकार करतो

---

## वर्तमानसार

चमत्कार —इंदूर—संस्थान महेश्वर एथें वीस दिवसांमागें एक कावळा 'रामराम' अशी अक्षरें तोंडानें म्हणतांना पुष्कळांनीं ऐकिलें.

चीनच्या बादशाहाची राणी तालीमबाजी शिकत असून, तिणें नुक्ताच वज्रमुष्टीच्या कसरतीचा अभ्यास चालविला आहे. राजकुलीन स्त्रिया जें जें करितील तें तें थोडेंच आहे!

कैदी सोडणार—तुरुंगावरच्या इन्स्पेक्टर जनरल यांचे शिफारशीवरून मुंबई इलाख्यांतील एकंदर कैद्यांपैकीं २६८ कैदी, त्यांच्या चांगल्या वागणुकीबद्दल सोडून देण्याचा सरकारानें ठराव केला असल्याचें समजतें.

बडी सोयरीक—श्री. सातारचे ... पेटपति महाराज यांचे कनिष्ट पुत्रा ... दे सरकार आपली कन्या देत न सरास- विचार चालू ... ची खाक झाली समज होऊन फारकती

टांकसाळ— गेल्या आठवड्यांत येथील टांकसाळेंत ११,१६,३०९ रुपयांची चांदी शीलक होती. यांत आणखी ४,९३,२८८ रुपयांची नवी आली. पैकीं १६,९०,२०९ रुपयांचें नाणें पाडून दिलें, व बाकी ५४,०८,३२२ रुपयांची शिलक आहे. याशिवाय ९,७८,१३२ रुपयांची खानगी व्यापाऱ्यांची चांदी परीक्षेकरितां येऊन पडलीच आहे.

मुंबई—मुसलमान लोकांचे ताबुतांची ता. १९ रोजीं मिरवणूक होऊन विसर्जन झालें. यंदा एकंदर १६६ ताबूद आणि ८९७ पंजे करण्याबद्दल परवाने देण्यांत आले होते.

ट्रान्स कास्पियन रेलवे—सदर रेलवेचें काम रशियन लोकांनीं मोठ्या झपाट्यानें चालविलें आहे. पुढील वर्षी झार साहेबास मध्य एशियाचे बादशाह बनविण्याचा रशियन लोकांचा विचार आहे. त्यास अनुसरून ही तयारी येरवच आहे.

महाराज धुलीपसिंग—हे येत्या डिसेंबर महिन्याच्या १६व्या तारखेच्या सुमारास मुंबईस येणार आहेत.

गुलामांचा व्यापार—कराचीच्या पत्रकर्त्यास अशी बातमी लागली आहे कीं, इराणी आखातांत एक गुलामांचें गलबत पकडण्यांत आलें आहे. त्यांत ९० तरुण मुली व कांहीं मुलगे सांपडले आहेत. नहीं अभागी मंडळी मस्कतच्या पोलिटिकल रेसिडेंटकडे पाठविली आहे.

राज्यत्याग—बुखाऱ्याच्या अमीर साहेबांनीं राज्यपद सोडून आपल्या द्वितीय पुत्रास राज्याभिषिक्त करविला असल्याची बातमी उठली आहे.

अगोचर मडम—गुजराथ मित्रावरून असें कळतें कीं एका मडमेनें एका रेलवे गार्डाचे तोंडावर नखम करून त्याच्या फार मेहनतीनें कोरविलेल्या मिशांची शाश्वत विरहता केली या गुन्ह्याबद्दल मानिस्ट्रेटानें तीस १६ रुपये दंड व ८ दिवसांची कैद अशी शिक्षा दिली. व त्यावर ही मडम गोरडून म्हणाली " तुम्ही मला दंड पाहिजे तर हवा तितका करा, परंतु मी तुरुंगांत म्हणून कधी कधी कधी जायाची नाहीं " इतकी हस्तकाट या बाईनें केली परंतु शेवटीं हातपाय बांधून घेऊन तिला तुरुंगांत जावें लागलें.

ब्रह्मदेश प्रकरण—हिंदुस्थान सरकारानें ब्रह्मदेशाच्या राजास पत्र पाठविलें आहे त्यांत पुढील तीन गोष्टी आहेतः— १ ब्रह्मदेश प्रकरणाचे संबंधानें जो वाद पडला आहे त्याचा विचार करण्याकरितां ब्रिटिश वकिलाशीं बोलणें करावें. २ बाम्बे बर्मा ट्रेडिंग कार्पोरेशन संबंधानें मांजविलेला खटला बंद करावा. ३ व योग्य शर्तीवर ब्रिटिश रेसिडेंट आपल्या राज्यांत ठेवावा.

निकालाचे दोन मार्ग—ब्रह्मदेश प्रकरणाचे संबंधानें मार्क्विस आफ रिपन यांनीं दोन मार्ग सुचविले आहेत. एक थीबाचेस पदच्युत करून दुसरा कोणी त्या बसवावा. आणि दुसरा उत्तर ब्रह्मदेश योग्य रीतीनें कायमचा ट्रेटी- इं० प्र०

ed
We not hop
tus may be
worn by the
diseases," A

...तहासिलींतील एका स्त्रीचें आपल्या कुत्र्यावर अत्यंत प्रेम असल्यामुळें तिनें एखादा आपला अत्यंत जिवलग आप्त किंवा मित्र वारला असतां जसा शोक व उत्तरक्रिया वगैरे करावीं त्याप्रमाणें सर्व व्यवस्था केल्याचें समजतें.

आयर्लंडांतील लोकांनीं आपल्यास स्वातंत्र्य मिळविण्याचा निश्चय केला आहे व इंग्लिश सरकार जर या प्रयत्नास आड येईल तर त्यावर परदेशासंबंधानें ... प्रकारचे महत्व आणण्याचा त्यांचा विचार आहे. त्याचप्रमाणें सरकारचाही त्यांस स्वातंत्र्य न देण्याचा निश्चय आहे. हा वाद अठराव्या शतकांतील अमेरिकेच्या स्वातंत्र्य वादाप्रमाणें बहुतेक अशी दिसतो.

रशिया सरकारानें अफगाण सरहदीवर आगगाडीची सडक तयार करण्याची मंजुरी दिली, व सुमारें बारा महिन्यांत हिरात पासून १०० मैल सडक तयार होऊन त्यायोगें सेंटपिटर्सबर्ग पासून आठ दिवसांत सैन्य हिरातेस पोहोंचेल, व कितीही जलदी केली तरी लंडनहून पिशीन येथें लोकांस येण्यास २२ दिवस लागतील.

तारीख २२ व २३ सप्टेंबर रोजीं मोठें वादळ होऊन काशी येथें मनकर्णिकेच्या घाटावर कित्येक होड्या बुडाल्या.

मध्यप्रांतांतील मांढा येथील मनुलाल नावाच्या सावकारानें तेथें एक शाळा स्थापन करण्याकरितां ६२,००० रुपये दिले. त्याचें दरसाल व्याजाचें उत्पन्न २,९०० रुपये होतें.

चिनी सरकार हल्लीं आपल्या लष्कराची व्यवस्था करीत आहे. या सरकारचें लष्कर हल्लीं ७,००,००० आहे तें दुप्पट करण्याचें त्याच्या मनांत आहे व आणखी तें चार युद्धोपयोगी मोठीं जहाजेंही तयार करवीत आहेत असें समजतें.

पायोनियर व इंग्लिशमन पत्रांवरून इन्कमट्याक्स लवकरच बसेल असें दिसतें.

एका जपानी मनुष्यानें समुद्रांत उगवणाऱ्या एक प्रकारच्या गवतापासून कागद करण्याची युक्ति काढली आहे. हा कागद जाड असून पारदर्शक असल्याकारणानें खिडक्यांत लावण्यास कांचेबद्दल त्याचा उपयोग करितां येतो व तो रंगविला असतां, हुबेहूब रंगीत कांचेप्रमाणें दिसतो.

कास्पियन रेलवेचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें आहे.

मद्रास इलाख्यांतही दुष्काळ पडण्याची चिन्हें दिसत आहेत.

रशियन सरकारचा विचार बुखाऱ्यापासून चीन व मर्व्ह पर्यंत लवकरच तारायंत्र सुरूं करून नंतर आगगाडीचा रस्ता तयार करावयाचा दिसतो.

एका मुसलमानानें कोचनिच्या आसपासच्या प्रदेशांतील एक जमीन लिलावांत विकत घेतली व तेथें आपणास राहण्यास एक लहानसें घर बांधूं लागला. तेव्हां या जमिनींत पाणी फार जवळ लागेल असें त्यास वाटल्यावरून त्यानें तेथें विहीर खणण्याकरितां कित्येक मजूर लाविले. त्यांनीं सुमारें १२ फूटपर्यंत खोदल्यावर त्यांस खालीं एक तांब्याचा मोठा हंडा लागला. त्यांनीं ती बातमी लागलीच मालकास कळविली. मालक आणखी मजूर घेऊन तेथें आला व तो हंडा वर काढण्याचा प्रयत्न सुरू केला परंतु जसजशी त्याच्या सभोंवती असलेली वाळू व माती एका बाजूस करून तो वर काढण्याचा प्रयत्न करावा तसतसा तो खालीं जात आहेसें वाटे, शेवटीं पुष्कळ वाटाघाट झाल्यानंतर असें ठरलें कीं या हंड्यांत असलेलें द्रव्य कोणा तरी उच्च मनुष्यानें ठेवलेलें असून ठेवतेवेळीं त्यानें मनुष्याचा बळी दिला आहे, यास्तव काढते वेळीं दुसरा बळी दिल्याशिवाय तें वर निघणार नाहीं. म्हणून एका मनुष्यास कांहीं अमली पदार्थ खावयास देऊन त्यास बळी जाण्यास तयार केलें. परंतु अमल उतरल्यावर तो नाकबूल झाला म्हणून कित्येकजण रात्रीं त्याच्या घराबरचीं कौलें काढून आंत शिरण्याचा प्रयत्न करीत असतां आंतील मनुष्यांनीं आरडाओरड केल्यामुळें सर्वजण पळून गेले. दुसरे दिवशीं डेप्युटी कलेक्टर या इसमाच्या घरावरून कचेरींत जात असतां या मनुष्यानें त्यांस सर्व हकीकत सांगितली, व आपलें संरक्षण करण्याविषयीं विनंती करूं लागला, तेव्हां डेप्युटी कलेक्टरानें पोलिसास चौकशी करून रिपोर्ट करण्यास सांगितलें. हल्लीं तपास सुरू आहे. सु० प०

मिठाचें उत्पन्न खेरीज करून समुद्रावरील व जमिनीवरील जकातींचें उत्पन्न चालू सालचे पहिले पांच महिन्यांत ४६९०००० रुपये झालें. गेले सालीं याच सुमारास ३७३७००० रुपये होतें.

हंगाम सुरू झाल्यापासून तों ता. ११ सपटंबर पर्यंत चीन व जपान येथून ग्रेट ब्रिटन येथें १०३४१८६९ पौंड चहा पाठविण्यांत आला. गेले सालीं याच सुमारास ९१११९,९०१ पौंड पाठविण्यांत आला होता. युनायटेड स्टेटस व कानडा येथें वरील मुदतींत अनुक्रमें १९४१४२७ पौंड व ४१६७४३१ पौंड पाठविला.

हिंदुस्थानचे सर्व्हेखात्याचे रिपोर्टावरून पाहतां १८८३।८४ सालांत सुमारें २००००० नकाशे काढण्यांत आले. या सर्वांची किंमत दीड लाख रुपयांहून अधिक आहे. यांपासून लोकांचा उपयोग होतो म्हणजे झालें.

पेंजदे येथील कांहीं सारिक्स लोक रशियाच्या अमलास कंटाळून अफगाणिस्थानांतील किलावाली येथें येऊन राहिले आहेत असें समजतें.

कलकत्ता येथें एका साहेबाच्या बटलरानें बाजारांतून आणलेल्या जिनसांच्या किंमतींत एक आणा जास्त सांगितला म्हणून त्यास तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली आहे.

कान्स्टांटीनोपल येथील मंत्रिमंडळ बदलल्याची बातमी आहे.

ब्रह्मदेशांत गतवर्षी पेक्षां यंदा भाताच्या लावणीकडे शेंकडा ६ एकर जमीन जास्त आहे. ने० ओ०

सातारा येथील किल्ल्यावर गोऱ्या पलटणचे कांहीं लोक ठेवण्याचा सरकारचा विचार असून तो पाहण्यासाठीं लष्करी खात्या कडील पुणे डिव्हिजनचे जनरल सर जान रोस हे गेल्या रविवारीं गेले होते असें कळतें. शु० सू०

पोलीस स्त्रिया—चिनांत मोठ्या आवाजाच्या, ऊंच व मजबूत बांध्याच्या अशा ३६ पासून ४६ वर्षांच्या वयाच्या स्त्रिया पोलिसचें काम करितात. ज० वि०

नोटीस.

रा. खंडू वल्लद मुकामी वारी राहणार पातुर सेलबाबु यांस नोटीस देणार विठोबा वल्लद रामजी तारकशी राहणार पातुर सेलबाबू असें कळवितों कीं तुमचे कडे आमचे रुपये कर्जाऊ येणें मुळ रुपये १२६ त्याबद्दल सर्व हिशोब करून रुपये एकंदर तुम्ही आम्हांस देणें १६८ हा हिशोब तुम्ही सन १८८४ सालच्या पौष्य वद्यांत केला. व सदर्हू रुपये २१० आम्हांस जे देणें त्यांत तुम्ही आपल्या मळ्यांतील माल भुयमुग एकर १२ व सोनताग एकर ११ व गाजेर वगैरे किरकोळ बितराप मिळून एकंदर २६ एकर जमिनींतील उभें पीक सदरी जमोद केलें. तुम्ही आमच्या १६० रुपये मध्यें दिलें; त्या नंतर ज्या वेळीं सदरील माल तयार होण्याच्या वेळीं भुयमुग वगैरे आम्ही खणून ठरावाप्रमाणें नेत होतो परंतु तुमच्या मनांत आशा सुटून तुम्ही सदरील ठरावा खेरीज रुपये १० जास्त मागूं लागला. ते आम्ही देण्याचे नाकारिले. नंतर तुम्ही आमच्याशीं तंटा करूं लागला म्हणून आम्ही चार दिवस माल नेण्याचे तसेच ठेविले. व तो माल आजपावेतों आम्हांस कांहीं मिळाला नाहीं पुढें तुम्ही जानु लोखंडे व गुमानसिंग वल्लद बालाराम राहणार पातुर सेलबाबु यांच्या मारफतीनें सदरील रुपये १६० पंधरा दिवसांनीं देण्याचे ठरविले परंतु त्याप्रमाणें आज पावेतों कोणत्याही प्रकारचा निकाल झाला नाहीं. यास्तव करितां नोटीशीनें कळविलें जातें कीं, सदरहु रुपये १६० नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत निकाल करावा. असें न केले तर रीती प्रमाणें कोर्टांत काम चालवून जे नुकसान कलेर निकाल होई तों पर्यंत होईल, ते व नोटीशीचा खर्च सुद्धां तुम्हांस भरून द्यावा लागेल. कळावें तारीख २२ माहे आक्टोबर सन १८८५ इसवी.

(सही) विठोबा रामजी तारकशी राहणार पातूर सेलबाबु दस्तुर खुद.


## तयार आहे.

## हिंदुधर्मशास्त्र भाग १व२.

(दुसरी आवृत्ति)

नामदार रा. सा. वि. ना. मंडळीक सी. एस्. आय्. यांचे.

किंमत ८ रुपये व हांशील आठ आणे.

पत्रें (किंमती सुद्धां) ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीसाठीं ठेविलीं आहेत. व० स० कर्ते०


☞ हें पत्र अकोल्या येथें के. बा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.